## नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



# दैनिक जनता आवाज



साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेफ्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334



अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ६९ | बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


## संमिश्र

### औरंगाबाद खंडपीठाला धमकी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाला धमकीचा मेल आल्याची माहिती समोर आली आहे. बॉम्बस्फोटाची धमकी देण्यात आली आहे. हा धमकीचा मेल चेन्नई येथून आल्याचे बोलले जात आहे. याबाबतची माहिती मिळताच औरंगाबाद उच्च न्यायालय परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त करण्यात आला आहे. न्यायालयाच्या सर्व दरवाजांसमोर सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहेत. तसेच हा मेल कोणी पाठवला आहे, याबाबत पोलिस अधिकचा तपास करत आहे.

### पत्नीच्या मानेवर कुऱ्हाडीने वार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**घाटंजी :** चारित्र्यावर संशय घेत नवऱ्याने बायकोवर कुऱ्हाडीने वार करत जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यवतमाळच्या घाटंजी येथील नेहरूनगरमध्ये सोमवारी पहाटे ही घटना घडली. याप्रकरणी घाटंजी पोलिसांनी आरोपी नवऱ्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

### गुजरातमध्ये विमान कोसळले


**जनता आवाज वृत्तसेवा**

**अमरेली :** गुजरातमधील अमरेली येथील गिरिया रोडवरील एका निवासी भागात पायलट प्रशिक्षण केंद्राचे विमान कोसळले. या अपघातात पायलटचा मृत्यू झाला आहे. विमान कोसळल्यानंतर मोठा स्फोट झाला, ज्यामुळे संपूर्ण परिसरात घबराट पसरली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक आणि पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरू केले.

### लेकीवर अत्त्याचार अन् बायकोचा खून

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** तब्बल २१ वर्षांपासून फरार असलेला खून आणि बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपीला अखेर अटक करण्यात आली आहे. ही कामगिरी केली आहे मीरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयातील गुन्हे शाखा दोनच्या युनिटने. साजिद उर्फ परवेज शेख (५५) असे या आरोपीचे नाव आहे. २००४ साली याने आपल्या सावत्र मुलीवर बलात्कार केला आणि त्यानंतर तिच्या आईला देखील ठार मारले होते.




# ...अखेर हिंदी भाषेला स्थगिती?

## शालेय शिक्षण मंत्री दादा भुसेंची घोषणा

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : महाराष्ट्रात सध्या हिंदी भाषेवरून वातावरण तापले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने हिंदी सक्तीला विरोध केला आहे. राज्य शासनाच्या सुकाणू समितीत असलेल्या शिक्षण तज्ज्ञ रमेश पानसे यांनी देखील हिंदी भाषा पहिलीपासून सक्तीची करणे चुकीचा निर्णय असल्याचे म्हटले आहे. आता या संदर्भात शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. हिंदी भाषेच्या वापरासाठी आम्ही अनिवार्य हा शब्द वापरला होता. आता या शब्दाला शासन स्थगिती देत आहे. हिंदी भाषा ही बंधनकारक असणार नाही, असे दादा भुसे यांनी स्पष्ट केले आहे.**

पत्रकार परिषदेत बोलताना दादा भुसे म्हणाले, मी स्पष्टपणे नमूद करतो की, हिंदी भाषेच्या संदर्भात केंद्राकडून थपवले जात आहे असे सांगितले जात आहे, असा कुठलाही भाग नाही. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० मध्ये स्पष्टपणे भाषेच्या संदर्भात पॅराग्राफ आहे. तीन भाषा शिकवण्यासंदर्भात, तीन भाषेचा फॉर्म्युला तिथे दिला आहे. केंद्राने कोणतीही भाषा राज्यासाठी बंधनकारक केलेली नाही, असे दादा भुसे यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना दादा भुसे म्हणाले, २०२० चे शैक्षणिक धोरण आहे. त्यानुसार ९ सप्टेंबर २०२४ ला तीन भाषांपैकी दोन भाषा आपल्या देशाच्या संबंधित असल्या पाहिजेत, असे सांगण्यात आले आहे. राज्य सुकणू समितीच्या बैठकीत तिसरी भाषा हिंदी म्हणून स्वीकारण्याचा निर्णय झाला होता. तसेच या संदर्भातील शासन निर्णयात हिंदी भाषा अनिवार्य असा उल्लेख झाल्याने संभ्रम निर्माण झाला आहे.



त्यामुळे अनिवार्य या शब्दाला स्थगिती देत आहोत आणि पुढील शासन निर्णय यथावकाश निर्गमित करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

शिक्षण विभागाचे ८ विभाग आहेत, त्या प्रत्येक ठिकाणी आपण शाळा तयार करणार आहोत. जे खेळामध्ये प्रविण्य दाखवतात त्यांना निवासी सोयीसुविधा उपलब्ध करून देता येईल. राज्यव्यापी वेगवेगळ्या पद्धतीचे आनंद गुरुकुल निवासी शाळा सुरू होतील, ज्या स्पेशालिटी शिक्षण देतील अशा शाळा तयार करत आहोत, अशी माहिती दादा भुसे यांनी दिली आहे.

पुढे बोलताना दादा भुसे म्हणाले, राज्यातील ६५ शिक्षण संघटनाची बैठक आयोजित करण्यात आली होती त्यातून मोठी चर्चा झाली. शिक्षकांची इतर अशैक्षणिक काम कशी कमी करता येतील? यासाठी जीआर काढून शैक्षणिक आणि अशैक्षणिक काम बाजूला करून कमीत कमी इतर काम शिक्षकांना दिली जातील. शासन निर्णयची कडक अंमलबाजवणी केली जाईल.

हिंदी भाषावरून राज्याच्या राजकारणामध्ये मोठा गदारोळ उडाला होता. मात्र हिंदी भाषाला स्थगिती मिळाल्याने बहुतेक ठिकाणी आनंद उत्सव साजरा करण्यात येत असल्याचे बोलले जात आहे.

**मराठी विषय बंधनकारकच**

मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये मराठी विषय बंधनकारक आहेच. पण, इतर माध्यमाच्या शाळांमध्ये सुद्धा मराठी भाषा विषय बंधनकारक केला गेला आहे. त्या शाळेत मराठी शिकवणारे शिक्षक सुद्धा मराठी भाषेत पदवी मिळवलेले असले पाहिजे याचेही बंधन असल्याचे दादा भुसे यांनी सांगितले आहे.

सीबीएसईच्या चांगल्या बाबीचा स्वीकार आपल्या अभ्यासक्रमात करणार आहोत. चांगले मुद्दे आपण सीबीएसईकडून घेणार आहोत. व्यापक स्वरूपात इतिहास भूगोल अभ्यासक्रमात दिसेल. तसेच, शिक्षक भरती सुद्धा आपण करत आहोत. १०,५०० शिक्षकांची भरती आपण करत आहोत. पवित्र पोर्टलवरुन ही भरती होणार आहे.

**-दादा भुसे, शालेय शिक्षण मंत्री**

# गाळ उपसासाठी ९ कोटींचा निधी

## आ. काशिनाथ दातेंची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पारनेर :** जिल्हा जलसंधारण अधिकारी मृदू व जलसंधारण विभाग गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत पारनेर तालुक्यातील पाझर तलाव व शिवारातील गाळ उपसा करण्यासाठी मतदारसंघातील प्रस्ताव आलेल्या ९० तलावांतील गाळ उपसा करण्यासाठी ९ कोटी ६ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आ. काशिनाथ दाते यांनी दिली आहे.

ही योजना ३ वर्षाकरिता मर्यादित न राहता कायमस्वरूपी राबवण्यात येणार असल्याचेही आ. दाते यांनी सांगितले आहे. सदर योजनेत स्थानिक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन योजनेचा लाभ घ्यावा. तसेच सार्वजनिक व खाजगी भागीदारी, अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर, सनियंत्रण, मूल्यमापन तसेच शेतकऱ्यांना अनुदानाची मर्यादा, अंमलबजावणी संदर्भातील मार्गदर्शन व कार्यपद्धती, सनियंत्रण समिती, निधीचे स्रोत याबाबतची माहिती देणार आहे.

गाळ उपसा करणेकरीता आवश्यक असलेली यंत्रसामग्री व इंधनावरील खर्च दोन्ही मिळून ३१ प्रति घ. मी. यानुसार गाळ वाहून नेण्यासाठी अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांना एकरी रु. १५ हजार मर्यादेत प्रति घ. मी. रु. ३५.७५ प्रमाणे शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत या लेखाशीर्षातून करण्यात येणार आहे. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत ९० कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे.

शासनाच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेचा शेतकऱ्यांनी फार मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, गाळमुक्त झाल्याने तलावाची साठवण क्षमता वाढुन पाझराचे प्रमाण वाढेल, तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन सुपीक होऊन भुगर्भातील पाणी पातळीत वाढ होईल.

**- काशिनाथ दाते, आमदार**


# 'मळगंगा' दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी

## निघोजमध्ये श्री मळगंगा देवी यात्रोत्सव; नवसाला पावणारे जागृत देवस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** राज्यात जागृत व नवसाला पावणारे म्हणून प्रसिद्ध असलेल्या निघोज येथील श्री मळगंगा देवीच्या यात्रेसाठी राज्यभरातून प्रचंड उन्हाची तमा न बाळगता अफाट जनसमुदायानी हजेरी लावली.

काल दि. २२ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता निघोज ग्रामस्थ व भाविक भक्तांनी श्री मळगंगा मातेचे नतमस्तक होत दर्शन घेतले. तद्नंतर मातेची घागर असलेली पालखी मातेचा जयघोष करत हेमाडपंथी बारवेकडे घेऊन गेले. तेथे मातेचे मानकरी, देवीचे पुजारी संतोष गायखे यांच्या हस्ते मातेच्या घागरीची विधीवत पूजा करण्यात आली.



राज्यात नवसाला पावणारी व जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री मळगंगा मातेची घागर मिरवणूक हा एक अद्भूत सोहळा पाहण्यासाठी व मातेचे साक्षात दर्शन घेण्यासाठी शब्दात मोजता न येणारी अफाट महिला, पुरुष, आबाल वृद्ध, अगदी लहानांपासून तर थोरांपर्यंतचे भाविक भक्त श्रद्धेने व भक्ती भावाने सामील होतात.

यावेळी महिला मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन आपल्या डोक्यावर पाण्याने भरलेली कळशी घेऊन या घागर पालखीच्या मागे मातेचा मोठ्या श्रद्धेने जयघोष करत सहभागी झाल्या होत्या.

ही मिरवणूक पेठेतून श्री मळगंगा माता मंदीरापर्यंत आल्यानंतर मंदीराबाहेर देवीच्या पुजारी सोनीताई गायखे, संध्या गायखे, सुवर्णा पान ४

दैनिक जनता आवाजच्या वतीने श्री मळगंगा देवी यात्रेची प्रसिध्द केलेली विशेष पुरवणी माहिती व अभ्यासपूर्ण असून यात श्री मळगंगा मातेची संपूर्ण माहिती, महिमा दिल्याने यात्रेकरू, ग्रामस्थांच्या दृष्टीने खूपच महत्त्व पूर्ण आहे. या विशेषांकाचे प्रकाशन माझ्या हातून झाल्याने खूप समाधान वाटते. या वृत्तपत्रात वस्तुनिष्ठ बातम्या असतात. त्यामुळे वाचनास उपयुक्त असे हे वृत्तपत्र आहे. नगर जिल्ह्यातील आघाडीचे असलेले दैनिक जनता आवाज हे निःस्पृह वृत्तपत्र असल्याचे गौरवोद्गार खा. निलेश लंके यांनी काढले.

# मंत्री विखेंमुळेच उपसा यंत्रणा कार्यान्वित

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे शेतकऱ्यांनी मानले आभार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने निळवंडे धरणातील नविन उपसा यंत्रणा प्रथमच कार्यान्वित झाल्याने धरणातील पाणीपातळी मोठ्या प्रमाणात कमी झाली असतानाही उच्चस्तरीय पाईप कालव्यातून पाण्याचा प्रवाह यशस्वीपणे सुरू झाला. कडक उन्हाळ्यात उपसा यंत्रणेमुळे निळवंडेचे पाणी पोहोचल्याचा मोठा दिलासा ग्रमास्थांना मिळाला असून, विहिरींच्या पाण्याची पातळी वाढण्यास मदत होणार आहे.

संगमनेर येथे जलसंपदा विभागाची बैठक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेत मंत्री विखे पाटील यांनी विभागाच्या अधिकाऱ्यांना काही महत्वपूर्ण सूचना करून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्यास सांगितले होते.



आ. डॉ. किरण लहामटे, आ. अमोल खताळ, माजी आ. वैभवराव पिचड, कैलासराव वाकचौरे यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

यावेळी अनेक शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर मंत्री विखे पाटील यांनी सकारात्मक निर्णय घेवून उच्चस्तरीयचे पाणी कळस गावाला मिळण्याच्या दुष्टीने कार्यवाही केल्याने आज आवर्तनाचे पाणी पोहचल्याचे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे संकल्पनेतून फक्त अकोले तालुक्यासाठी असणाऱ्या निळवंडे धरणाच्या उच्चस्तरीय पाईप कालव्यांचा लाभ तालुक्यातील २ हजार ३२८ हेक्टर पान ४

उच्चस्तरीय कालवे झाल्यापासून कळस आणि पंचक्रोशीतील गावांना पाणी आले नव्हते. मात्र संगमनेर येथील बैठकीत मुद्दा उपस्थित झाला. याबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली. डॉ. सुजय विखे पाटील यांनी विशेष सहकार्य केले आहे. तर कैलासराव वाकचौरे यांनी प्रयत्न केले आहे.

**- भाऊसाहेब वाकचौरे,माजी सरपंच**

# शेतीला शाश्वत करण्यासाठी प्रयत्नशील

## राज्यपालांच्या उपस्थितीत विद्यापीठाचा पदवीदान समारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** वाढता उत्पादन खर्च, मर्यादित बाजारपेठ प्रवेश आणि अपुरी भावनिश्चिती प्रणाली यामुळे कृषी क्षेत्र अधिक अडचणीत येत असतांना भारतीय शेतीला शाश्वत, आर्थिक लाभाची आणि भविष्यासाठी सक्षम व्यवसायात रूपांतरित करण्यासाठी कृषी विद्यापीठांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या ३८ व्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कृषीमंत्री




ॲड. माणिकराव कोकाटे, कृषी वैज्ञानिक निवड मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय कुमार, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, कुलसचिव डॉ. नितीन दानवले आदी उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले की, हवामान बदलांना तोंड देणाऱ्या पिकांच्या जाती विकसित करून, सेंद्रिय शेती, समग्र अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि सूक्ष्म सिंचनाचा प्रसार करून कृषी विद्यापीठे हवामान बदलांचे परिणाम कमी करण्यात आणि उत्पादकता वाढवण्यात मदत करू शकतात. कृषी पदवीधरांनी स्थानिक घटक लक्षात घेऊन पिकांचे वाण विकसित करावे. विद्यापीठांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि अचूक शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांसारख्या डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतकऱ्यांना पान ४

# केंद्र प्रमुखांना कामे समजून सांगा

## शिक्षकांची मागणी; कामाऐवजी बाहेर फिरण्यात व नेतेगिरीत दंग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर : जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात केंद्र प्रमुख हा शाळा व गटशिक्षणाधिकारी कार्यालय यांच्यातील दुवा आहे. परंतु, त्यांना त्यांची काय कामे आहेत, याची माहिती नसल्याच्या तक्रारी शिक्षकांमधून होत आहे. शाळांमध्ये समन्वय साधण्याऐवजी काही केंद्र प्रमुख आपले संपर्क अभियान मोठ्या प्रमाणात राबवून केंद्राच्या बाहेरील कामात व्यस्त असल्याची चर्चा शिक्षकांमध्ये सुरु आहे.**

जिल्ह्यात पूर्वी केंद्र प्रमुखांची पदे रिक्त होती. ती आता काही प्रमाणात भरण्यात आलेली आहे. ही पदे भरावी म्हणून इच्छुकांनी अनेकदा त्या संदर्भात पाठपुरावा करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. जिल्हा परिषदेने जिल्ह्यातील सर्वच भागातील केंद्र प्रमुखांची रिक्त पदे पदोन्नतीने भरलेले आहेत. काही रिक्त पदे असून ती ही लवकरच भरण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषदेच्या सूत्रांकडून सांगण्यात आले.

ज्यांनी केंद्र प्रमुख म्हणून पदोन्नती मिळावी, यासाठी अट्टाहास केला. तेच त्या पदाला न्याय देत नसल्याची चर्चा सध्या जिल्ह्यातील शिक्षकांमध्ये सुरु आहे. केंद्राची हद्द सोडून केंद्र प्रमुख जिल्ह्यातील इतर भागात दिसून येत आहे. याबाबत गटशिक्षण अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप शिक्षकांमधून केला जात आहे.



विशेष म्हणजे ही बाब शिक्षणाधिकारी कार्यालयाला माहिती होऊनही ते याकडे गांभिर्याने लक्ष देत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. एकाकडून दुसऱ्याला व दुसऱ्याकडून तिसऱ्या तोंडी सर्वच शिक्षकांच्या कानी पडली आहे. त्यामुळे या प्रश्नी जिल्हा परिषद प्रशासनाने गांभिर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे. शिक्षक म्हणून प्रत्येकाचे काम महत्वाचे आहे नेतेपद नाही. शिक्षक असो की, केंद्र प्रमुख किंवा विस्तार अधिकारी कोणतेही पद असले तरी त्या पदाप्रमाणे प्रत्येकाने काम करणे महत्वाचे आहे. हे काम करत असताना प्रत्येकाने नेतेपद बाजूला ठेऊन काम करणे महत्वाचे आहे. परंतु, पदाबरोबरच नेते असल्याचे भासवून कामातून काही जण सूट घेत असल्याची चर्चा जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांमध्ये सुरु आहे. या नेते मंडळीच्या नेतेगिरी पुढे प्रशासन झुकत आहे.

प्रशासनाने कामाच्या ठिकाणी काम ठेवण्याच्या सूचना सर्वांना द्याव्यात, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे. केंद्रप्रमुख हे प्रशासकीय पद असल्याने या पदावर काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने शिक्षक संघटनेच्या इतर पदांवर काम करू नये. ते नियम बाह्य आहे. तालुक्यातील काही केंद्रप्रमुख हे गटशिक्षणाधिकाऱ्यांचे एजंट म्हणून काम पाहत आहेत.

**कामांचे मूल्यमापन करा**

जिल्ह्यातील शिक्षण विभागात असलेल्या विविध पदाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामाचे मूल्यमापन करावे, अशी मागणी होत आहे. काही केंद्रप्रमुख आपल्या केंद्रातील शिक्षकांना वेठीस धरत आहेत. तसेच संघटनेच्या नावाखाली त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहेत, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात आहेत. प्रशासन यावर काय कारवाई करते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मायलेकाचा विजेच्या धक्क्याने दुर्दैवी मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील चांडगाव येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांची दि. २२ एप्रिल २०२५ रोजी यात्रा होती. त्यामुळे घरातील स्वच्छता करण्यासाठी राजेंद्र हिरामण लोंढे यांनी घरातील आवराआवर करुन घर धुत असताना विजेचा धक्का बसला मुलाला वाचविण्यासाठी आई सखुबाई हिरामण लोंढे या धावुन आल्या मात्र त्यांनाही विजेचा धक्का बसला.

दोघाही माय-लेकांना ताबडतोब श्रीगोंदा येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हि घटना सकाळी आठच्या सुमारास घडली.



काल गावाची यात्रा असल्याने आणि घडलेल्या या दुर्दैवी घटनेने गावावर शोककळा पसरली आहे. यात्रेच्या दिवशीच अशी दुर्दैवी घटना घडल्याने तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.त्यांच्या मागे वडील, भाऊ, पत्नी, भावजय, चार बहिणी व दोन मुले असा परिवार आहे.

खरं तर प्रत्येक कुटूंबियांनी घरातील विजेपासुन काळजी घेणे गरजेचे आहे. घरातील विद्युत साधणसामुग्री हाताळतांना स्वतःचा बचाव होईल, अशा उपाययोजना कराव्यात.

# पाण्याची टंचाईवर योग्य उपाययोजना करा

## आ. आशुतोष काळे यांच्या सुचना ; कोपरगाव तहसील कार्यालयात आ. काळे यांची टंचाई आढावा बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव मतदार संघात मागील वर्षी चांगल्या प्रकारचे पर्जन्यमान झाले असले तरी मतदार संघातील काही गावात नागरीकांच्या व पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. हि टंचाई दूर करून नागरीकांना व जनावरांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणार नाही, यासाठी योग्य उपाययोजना करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी प्रशासनाला केल्या आहेत.

कोपरगाव तहसील कार्यालयात आ. काळे यांनी टंचाई आढावा बैठक घेवून विविध विभागाचा आढावा घेतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले याप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलतांना आ. काळे यांनी सांगितले की, मतदार संघात मागील वर्षी चांगल्या प्रकारचे पर्जन्यमान झाल्यामुळे मतदार संघात पाणी टंचाई जाणवणार नाही, अशी परिस्थिती होती.

परंतु फेब्रुवारी महिन्यापासूनच मोठ्या प्रमाणात उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाली असली तरी नागरीकांना पाणी टंचाईची झळ बसू देणार नाही. सातत्याने पाणी टंचाईच्या झळा सोसणाऱ्या जिरायती भागातील जवळके, शहापूर, बहादराबाद, बहादरपूर वगळता बहुतांश गावांमध्ये निळवंडेचे पाणी पोहोचले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत नाही.

पालखेड कालव्याच्या लाभक्षेत्रातील उक्कडगाव, शिरसगाव, तिळवणी, सावळगाव, आपेगाव या गावांना ओव्हरफ्लोचे पाणी मिळाले मात्र त्यानंतर पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाणी न दिल्यामुळे या गावांमध्ये पाणी टंचाई जाणवत आहे.



त्याबाबत जलसंपदा मंत्र्यांकडे पालखेड डाव्या कालव्याच्या अधिकाऱ्यांची तक्रार करणार आहे. त्याचबरोबर पालखेड, एक्स्प्रेस तसेच उजव्या-डाव्या कालव्याच्या पाण्यावर लाभक्षेत्रातील गावांचे आरक्षण मिळण्याबाबतचे प्रस्ताव ग्रामपंचायतींनी तातडीने तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत त्याबाबत पाठपुरावा करू.

यावेळी तहसीलदार महेश सावंत, नगरपरिषद मुख्याधिकारी सुहास जगताप, नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते, गटविकास अधिकारी संदीप दळवी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विकास घोलप, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अशोक लोहारे, गोदावरी डाव्या कालव्याचे उपविभागीय अभियंता संदीप पाटील, उजव्या तट कालव्याचे उपविभागीय अभियंता संभाजीराव पाटील, वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता धनंजय धांडे, डी. डी. पाटील, पशु संवर्धन अधिकारी डॉ. श्रद्धा काटे, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनराव काळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, पद्मविभुषण डॉ. शरदचंद्रजी पवार नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास केकाण, विष्णु शिंदे, वाल्मिक कोळपे, राजेंद्र खिलारी, देवचंद कडेकर, महेंद्र काळे, संतोष चवंडके, विविध ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> ▶ ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध नाही व टँकर सुरु करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी पंचायत समितीला उपाय योजना करण्याच्या सूचना दिल्या. ज्या गावांनी आपल्या अडचणी मांडल्या त्याबाबत प्रस्ताव द्या जेणेकरून त्या अडचणी लवकरात लवकर सोडविल्या जातील. उष्णता वाढतच चालली आहे त्यामुळे टंचाई जाणवणार नाही अशा अपेक्षा होत्या परंतु आता टंचाई निवारण करण्यासाठी तहसील. पंचायत समिती प्रशासनाने योग्य नियोजन करून प्रभावी उपाय योजना कराव्यात. नागरीकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणार नाही याची काळजी घ्यावी.
>
> – आशुतोष काळे, आमदार

# पेडगाव सोसायटीच्या चेअरमनपदी खेडकर

## व्हा. चेअरमनपदी निलेश झिटे यांची बिनविरोध निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** दि. १८ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या पेडगाव विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन व व्हा. चेअरमन निवड करण्यात आली असून विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे नवनिर्वाचित चेअरमनपदी शहाजी खेडकर यांची निवड करण्यात आली तर व्हा. चेअरमन म्हणून निलेश झिटे यांची निवड करण्यात आली.



सहा एप्रिल रोजी नुकत्याच पार पडलेल्या विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत महाराष्ट्र राज्य प्रदेश युवक काँग्रेस उपाध्यक्ष प्रशांत ओगले, सुनील खेडकर, नानासाहेब झिटेतळ, भगवान कणसे, गणेश झिटे यांच्या नेतृत्वाखालील भैरवनाथ कीसान क्रांती पॅनलला १३ पैकी.१० जागा मिळवून दणदणीत विजय संपादन करण्यात यश मिळाले होते.

काल दि. १८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता नुकत्याच पार पडलेल्या चेअरमन व्हा. चेअरमन निवड प्रक्रिया पार पडली.

या निवडीवेळी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत ओगले, गणेश झिटे, सुनील खेडकर, नानासाहेब झिटे, आयुब शेख, दादा काटकर, भगवान कणसे, शहाजी खेडकर, निलेश झिटे, अशोक पवार, शरद झिटे, मनोहर खेडकर, निलेश शिरसागर, शालन नवले, विशाल कानडे, पोपट गावडे यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चौंडीतील मंत्रिमंडळ बैठकीची प्रशासनाकडून जय्यत तयारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** चौंडी (ता. जामखेड) येथे राज्य मंत्रिमंडळाची बैठक पुढील आठवड्यात (दि. २९ एप्रिल ) होणार आहे. या बैठकीची प्रशासनाकडून तयारी करण्यात आली आहे. बैठकीसाठी मंडप, ध्वनिक्षेपक यंत्रणा, विद्युत यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरे इत्यादींसाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती सोहळ्याचे त्यांचे जन्मगाव असलेल्या चौंडी येथे आयोजन करण्यात आले आहे. तसेच त्यापूर्वी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

# चंदना महिला मंडळाच्या अध्यक्षपदी रेखा पाटणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर दिगंबर जैन समाजाच्या चंदना महिला मंडळाचे नूतन कार्यकरण्याची



निवड सर्व महिलांचे उपस्थितीत सर्वानुमते ठरविण्यात आली. अध्यक्षपदी रेखा पाटणी तर सेक्रेटरीपदी साधना चुडिवाल, उपाध्यक्षपदी सुनीता गोधा, खजिनदारपदी सुनिता चुडीवाल तसेच सल्लागारपदी जयमाला चुडीवाल व कार्यकारणी सदस्य म्हणून कल्पना मिरेकर, नीलम पाटणी, वैशाली बडजाते, साधना कासलीवाल, जूली कासलीवाल, श्वेता गोधा, प्रणोती कासलीवाल, संध्या काला यांची निवड झाली आहे. रेखा पाटणी यांनी यापूर्वी श्रीरामपूर औद्योगिक वसाहतमध्ये संचालक म्हणून पाच वर्षे काम केले आहे. तसेच अखिल भारतीय मारवाडी महिला मंडळाच्या एक वर्षासाठी अध्यक्षपदी भूषवलेले आहे. भाग्यदय नागरी पतसंस्थेच्या संचालक म्हणून काम केले आहे आता वसुंधरा महिला मंडळाचे सेक्रेटरीपदी आहे.

# बँक अधिकाऱ्यांसह कृषी अधिकाऱ्यांचा निरोप समारंभ

## नुतन शाखाधिकारी राजवीर यांचे ग्रामस्थांकडून स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** खर्डा शाखेचे कर्तव्यदक्ष शाखाधिकारी अभिजीत साळुंखे व कृषी अधिकारी रमेश शिंदे यांची बदली झाल्याने त्यांचा खर्डा ग्रामस्थ व सहकाऱ्यांनी एकत्र येऊन निरोप समारंभ केला व पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच त्यांच्या जागी आलेले नवीन शाखाअधिकारी सचिन राजवीर यांचे स्वागत करण्यात आले. अभिजीत साळुंखे यांनी खर्डा सेंट्रल बँकेच्या शाखेच्या वतीने पंचक्रोशीमधील उद्योजक



वाढावे व परिसरातील तरुणांना उद्योग व्यवसाय कडे चालना मिळावी व नव युवा उद्योजक घडावे यासाठी सुमारे त्यांच्या खर्डा शाखेतील कार्यकाळात २० कोटी रुपये कर्ज वाटप केले.

तसेच कृषी अधिकारी रमेश शिंदे यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडिया खर्डा शाखेचे ४ वर्षात नवीन १००० शेतकरी बांधवांना पिक कर्ज वाटप केले. खर्डा पंचक्रोशीत एकच राष्ट्रीयकृत बँक असल्याने ग्राहकांची सतत गर्दी राहत असल्याने व कमी कर्मचारी असल्याने सुरवातीच्या काळात बँकिंग कामकाजास रात्री ९ वाजेपर्यंत या दोघा अधिकाऱ्यांनी काम करून आपल्या कामाप्रती असणारी निष्ठा व जबाबदारी यशस्वीपणे पार पडली.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहाबाज सय्यद यांनी केले. तसेच कर्मचारी संजय घाडवे, सौरभ पानगावकर, उमेश बाभळे, मगन चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास पत्रकार दत्तराज पवार, हैबती मोरे, धीरज मोरे, योगेश लटके, इब्राहिम मुजावर आदी उपस्थित होते.

# श्रीगोंद्यातील भैरवनाथ महाराजांचा आज यात्रोत्सव

## महिनाभरापासून यात्राउत्सव समितीचे परिश्रम ; यात्रेसाठी कडक पोलिस बंदोबस्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** सालाबादप्रमाणे श्रीगोंदा शहरातील ग्रामस्थांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री भैरवनाथ महाराज यांचा यात्राउत्सव यावर्षी आज दि. २३ व २४ एप्रिल रोजी असे दोन दिवस मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे, असे भैरवनाथ यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने सांगितले.



दरवर्षी चैत्र शु, दशमीला श्री भैरवनाथ महाराज यांचा यात्रा उत्सव भरतो. यावर्षी आज दि. २३ व २४ एप्रिल रोजी संपन्न होत असुन आज सकाळी ६ वाजता भैरवनाथ महाराज यांचा अभिषेक व महापुजा होईल सायंकाळी ६ वाजता देवाचे गाडे ओढणे,रात्री ९ वाजता छबीना, रात्री ९ वाजता शोभेची दरुकाम व रात्री १० वाजता भजनी मंडळाच्या कार्यक्रम होईल.

यात्रेनिमित्त श्री भैरवनाथ महाराज मंदिर व परिसरात भव्य दिव्य अशी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यासाठी गेल्या महिनाभरापासून यात्रा उत्सव कमिटी व ग्रामस्थ अहोरात्र परिश्रम करत आहेत. यात्रेत कसलाही गैरप्रकार होऊ नये, म्हणून पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

▶ यात्रेनिमित्त श्री भैरवनाथ महाराज मंदिरात दि. १४ ते २१ एप्रिल २०२५ पर्यंत व्यासपीठ चालक भगवान महाराज गिरमकर यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न झाला. या पारायण सोहळ्यानिमित्त सप्ताह काळात दररोज सायंकाळी ५ ते ६ यावेळेत विठ्ठल महाराज पोटे, तुकाराम महाराज धुमाळ, दत्तात्रय महाराज खेडकर, आदी महाराजांचे कीर्तन होणार आहे.

### उद्या कुस्त्या व लोकनाट्य तमाशा

▶ दि. २४ रोजी दुपारी ३ ते ७ कुस्त्यांचा जंगी आखाडा होणार असुन राज्यातील विविध भागातील मल्ल यावेळी उपस्थित असतात हे व रात्री ९:३० वाजता मंगला बनसोडे करवडीकरसह नितिनकुमार बनसोडे यांचा लोकनाट्याचा कार्यक्रम संपन्न होईल.

# ... किमान सहा महिने तरी टिकू द्या : पाटील

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळायचा आनंद सहा महिने तरी टिकू द्या रे, असे उद्विग्न मनोगत पानिपतकार विश्वास पाटील यांनी मराठी भाषेचे उगमस्थान असलेल्या नेवासा येथील संत ज्ञानेश्वरांच्या पैस मंदिरात व्यक्त केले.

आज त्यांनी ज्ञानेश्वरी लिखाण स्थान व मराठी भाषेचे निर्मितीच्या ठिकाणी ज्ञानेश्वर महाराजांच्या कर्मभूमी नेवासेला भेट दिली मराठी भाषेच्या सध्याच्या स्थितीबद्दल मनातील भावनांना वाट मोकळी करून दिली.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर ज्ञानोबांनी ज्ञानेश्वरी जिथे लिहिली, त्या पवित्र नेवासा नगरीला भेट देण्याचं माझं स्वप्न होतं. आज ते पूर्ण झालं, असे सांगतानाच त्यांच्या आवाजात एक वेदनेची छटा स्पष्ट जाणवत होती. कारण, अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या अवघ्या काही महिन्यांतच पुन्हा एकदा मराठीवर दबाव येऊ लागला आहे. त्यामुळे त्यांच्या बोलण्यातून मराठीच्या अस्मितेचे स्फोटक शब्द बाहेर पडले.

मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला




आणि राज्यभरात आनंदाची लहर उसळली. परंतु, हिंदी भाषेच्या सक्तीमुळे या अभिमानास व आनंदास काही महिने देखील टिकू दिल नाही, अशी खंत सुप्रसिद्ध लेखक आणि साहित्यिक आणि साहित्य अकॅडमी सदस्य विश्वास पाटील यांनी व्यक्त केली.

पाटील म्हणाले, कालच बातमी आली की, आमच्या भूमीतल्या लहान मुलांना अगदी पहिलीपासून हिंदी शिकवली जाणार आहे. हा निर्णय म्हणजे मराठीच्या अस्तित्वावर घाला आहे. हिंदी ही आमचीच भाषा आहे, तिचा आम्हाला अभिमान आहे. प्रेमचंद, भीष्म सहानी, फणेश्वर नाथ रेणू यांचा आम्ही सखोल अभ्यास केला आहे. मात्र लहानग्यांच्या कोवळ्या मनावर हिंदीची जबरदस्ती थोपवणे, हे अयोग्य आहे.

# सहा महिने उलटूनही आरोपी मोकाटच?

## पीडित महिलेचे जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील एका महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणातील आरोपी अजूनही मोकाट फिरत असल्याने पीडित महिला व त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने सोमवारी (दि. २१ एप्रिल) जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले. या आंदोलनास बहुजन समाज पार्टीच्या वतीने पाठिंबा देण्यात आला.

उपोषणात बसपाचे सुनिल ओव्हळ, सिंधुबाई जाधव, संजय जाधव, कचरू लष्करे, राजू शिंदे, शहानवाज शेख यांच्यासह पीडित महिलेचे कुटुंबीय सहभागी झाले होते.

श्रीगोंदा तालुक्यातील एका गावातील महिलेला लग्नाचे आमिष दाखवून अविनाश कोठावळे (रा. कोठावळे सांगवी, ता. पारनेर) याने वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवले. पीडितेसोबत सहा महिने राहून तिला मारहाण करून घराबाहेर काढल्याची तक्रार पोलीस स्टेशनला दाखल झाली आहे. याप्रकरणी बेलवंडी (ता. श्रीगोंदा) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्हा दाखल होऊन सहा महिने उलटूनही आरोपीस अटक




करण्यात आलेली नाही. त्यामुळे उपोषणकर्त्यांनी आरोपीस त्वरित अटक करण्याची मागणी केली आहे.

### स्व. सोमैयाच्या वेदांत लबडेचे विविध परिक्षेत सुयश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव :** स्व. सौ. एस. के. सोमैया प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र श्रीरामपूर या शाळेचा इयत्ता तीसरी बचा विद्यार्थी वेदांत



लबडे याने मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत ३०० पैकी २६८ गुण मिळवून केंद्रात दुसरा क्रमांक महात्मा फुले परिक्षेत ३०० पैकी २२४ गुण मिळवून जिल्ह्यात चौथा, आय एम विनर या परीक्षेत २०० पैकी १६८ गुण मिळवून अहिल्यानगर जिल्ह्यात चौथा, भारत टॅलेंट सर्च या परीक्षेत १५० पैकी १२६ गुण मिळवून केंद्रात चौथा एक्सलंट ऑलिम्पियाड या परीक्षेत २०० पैकी १७८ गुण, लक्ष्यवेध परीक्षेत ३०० पैकी २६८ गुण मिळवून यश संपादित केले.

# शिवसेना अन् राष्ट्रवादीसारखाच कर्जतमध्ये तिढा?

## दोन गटनेते; कर्जतमधील अविश्वास ठरावाचा वाद न्यायालयात जाणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** राज्यातील राजकारणात अनेक नाट्यमय घडमोडी मागील अडीच वर्षांपूर्वी घडलेल्या आहेत. या नाट्यमय घडमोडींचा वाद अद्यापही न्यायालयात प्रलंबित असून तसाच काहीसा वाद आता कर्जत तालुक्यात झालेला आहे. दोन गटनेतेपदाचा तिढा आता समोर आलेला आहे. त्यामुळे नगरसेवकांसाठी कोणाचा व्हीप महत्त्वाचा राहिल, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

राज्यात महाविकास आघाडीला सरकारला भाजपने खिंडार पाडलेले आहे. त्यावेळी शिवसेनेचे एकनाथ शिंदे यांच्यासह काही नगरसेवक पक्षातून बाहेर पडले. त्यानंतर त्यांनी थेट पक्षावरच दावा केला. त्यावेळीही गटनेतेपदाचा वाद चव्हाट्यावर आला होता. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधूनही अजित पवार यांचा गट बाहेर पडला होता. त्यावेळीही दोन गटनेते पदाचा वाद झाला होता. तशीच काहीशी परिस्थिती आता कर्जत नगरपंचायतच्या राजकारणात आलेली आहे.

यामुळे कर्जत तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघालेले आहे. कर्जत नगरपंचायतीमध्ये संतोष मेहत्रे हे गटनेते यापूर्वी सर्व १५ नगरसेवकांच्या एकत्रित गटाचे गटनेते म्हणून निवडण्यात आले होते. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्यावतीने प्रदेशाध्यक्ष यांनी कर्जत नगरपंचायतच्या गटनेतेपदी अमृत काळदाते यांची निवड जाहीर केली आहे. तसे पत्र देखील जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे.

यामुळे आता दोन गटनेते



झाले आहेत. यामुळे कोणाचा आदेश कायदेशीर मानला जाणार आहे,. हा प्रश्न आता निर्माण झाला आहे. त्यायातच उषा राऊत यांनी आता नगराध्यक्षपदाचा राजीनामा दिलेला आहे. त्यामुळे नवीन ट्विस्ट आलेला आहे.

राऊत यांनी आपली भूमिका जाहीर केलेली असली तरी त्यांनी अनेक गोष्टी अद्याप स्पष्ट केलेल्या नाहीत. त्यामुळे येथील नगराध्यक्षपदाचा वाद न्यायालयात जाणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# बोडखेवाडी पॉईंटपासून चर खोदण्याच्या कामास प्रारंभ

## आ. आशुतोष काळे यांचे प्रयत्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्याच्या जिरायती भागातील गावात निळवंडे कालव्याचे पाणी पोहोचविण्यात येणाऱ्या अडचणी आ. आशुतोष काळेंच्या प्रयत्नातून दूर झाल्या आहेत. निळवंडे कालव्याचे पाणी जिरायती गावात पोहोचविण्यासाठी महत्वाच्या असणाऱ्या निळवंडे कालव्याच्या बोडखेवाडी पॉइंटपासून चर खोदण्याच्या कामास आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला आहे. त्यामुळे जिरायती परिसरातील रांजणगाव देशमुख, अंजनापूर, बहादरपूर आदी गावातील नागरिकांमध्ये



समाधानाचे वातावरण पसरले आहे.

चालू वर्षी उन्हाळा अधिकच तीव्र स्वरूपाचा असल्यामुळे नागरीकांना पिण्याच्या पाण्याची अडचण भासू नये, यासाठी रांजणगाव देशमुख उजनी उपसा जलसिंचन योजनेसाठी स्वत: पदरमोड करणाऱ्या आ. काळे यांनी शासनाच्यावतीने ज्या काही उपाय योजना कराव्या लागतील त्या उपाय योजना करण्याच्या सूचना प्रशासनाला दिलेल्या आहेत. त्याचबरोबर नागरीकांच्या देखील पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत ज्या काही मागण्या असतील. त्या मागण्या देखील पूर्ण करण्यात काळे तत्पर असल्यामुळे शेतकऱ्यांनी चर खोदून देण्याची मागणी करताच त्या मागणीची त्वरित दखल घेवून त्यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना सदर चर खोदून देण्याच्या सुचना दिल्या होत्या. सूचनेनुसार मंगळवार (द.२२) रोजी प्रत्यक्षात निळवंडे कालव्याच्या बोडखेवाडी पॉइंटपासून चर खोदण्याच्या कामास प्रारंभ देखील करण्यात आला आहे. मागील अनेक दशकापासून जिरायती गावातील शेतकऱ्यांचा प्रश्न आ.आशुतोष काळे यांच्यामुळे मार्गी लागला आहे. त्यामुळे रांजणगाव देशमुख-अंजनापूर परिसरातील पाझर तलाव व बंधारे भरुन देण्यासाठी मोठी मदत होवून नागरिकांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली निघणार आहे. त्याबद्दल रांजणगाव देशमुख, अंजनापूर, बहादरपूर आदी गावातील नागरिकांनी आ. काळे यांचे आभार मानले आहे.

### समस्या सोडविण्यासाठी कटिबध्द

आ. आशुतोष काळे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सांगितले की, आपल्या परिसराच्या अडचणी सोडविण्यासाठी मी कटिबद्ध असून ते माझे कर्तव्य आहे. हे पाणी आपल्यासाठीच आहे. त्यामुळे हे पाणी पाझर तलावापर्यंत लवकरात लवकर कसे पोहोचेल व आपल्या अडचणी कायमच्या दूर कशा होतील, यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच चर खोदण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशा सूचना उपस्थित निळवंडे कालव्याच्या अधिकाऱ्यांना त्यांनी दिल्या.

बोडखेवाडी पॉईंटपासून चर खोदण्याच्या कामास प्रारंभ करण्यात आल्यामुळे या चराच्या खोदकामाचा संगमनेर तालुक्यातील भागवतवाडी येथील शेतकऱ्यांना देखील फायदा होणार आहे. त्याबद्दल भागवतवाडी येथील शेतकऱ्यांनी आ. आशुतोष काळे यांचे आभार मानत त्यांचा सत्कार केला.

# बेपत्ता झालेल्या मुलींचा १८ तासात शोध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा तालुक्यातील मुळा काठ परिसरातील पानेगाव आणि शिरेगाव येथील विटभट्टीवरून बेपत्ता झालेल्या दोन अल्पवयीन मुलींची सोनई पोलिसांनी अवघ्या १८ तासांत सुटका केली. या प्रकरणी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

१६ एप्रिल २०२५ रोजी या मुली बेपत्ता झाल्या होत्या. सोनई पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने तातडीने कारवाई करत पुलतांबा परिसरातून मुलींची सुटका केली. पोलिसांनी शुक्रवारी रात्री ही कारवाई केली.

या घटनेनंतर सोनई पोलिसांनी अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय तुकाराम माळी (वय २४, रा. शिरे-गाव) आणि आकाश मधुकर बर्डे (वय २७, रा. वडगाव लांडगा, ता. संगमनेर) या दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. सुटका केलेल्या दोन्ही अल्पवयीन मुलींना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. पोलिसांनी तपास तीव्र केला असून, आरोपींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

# पुढील काळात काम करत राहणार

## माजी नगराध्यक्षा उषा राऊत यांचे सुतोवाच

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : नगरपंचायतच्या नगराध्यक्ष उषा राऊत यांनी नगराध्यक्षपदाचा जिल्हाधिकारी यांच्याकडे राजीनामा दिला. यानंतर त्यांनी सर्व नागरिकांचे आभार मानतानाच पुढील काळात देखील जनतेची सेवा करण्यासाठी सामाजिक कार्यामधून काम करत राहू असे सांगितले.

राजकारणापेक्षा समाजकार्य मोठे हा हेतू मनात ठेवूनच मी राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. कर्जत नगरपंचायततीची नगराध्यक्ष म्हणून जबाबदारी माझ्या खांद्यावर आली आणि माझ्या मते ती सक्षमपणे पेलण्याचा मी प्रामाणिक प्रयत्नही केला. घरात दोन लहान मुलं असताना आणि विशेष म्हणजे ज्यावेळी त्यांना आई म्हणून त्यांना माझी खूप जास्त गरज होती. त्या काळात मी त्यांचा थोडासाही विचार न करता केवळ सामाजिक बांधिलकी म्हणून घराबाहेर पडले. नागरिकांच्या हाकेला 'ओ' देण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला. या कर्जतकर जनतेनेही मला सून, मुलगी, बहीण म्हणून खूप प्रेम दिले. माझ्यावर सार्थ विश्वास ठेवला. परंतु घरभेदीपणा हा पूर्वी पासूनच आपल्या महाराष्ट्राला नवा नाही. म्हणून कुठलाही विचार न करता आमच्याच काही नगरसेवक सहकाऱ्यांनी मिळून डोळे झाकत माझ्यावर अविश्वास ठराव आणला आणि मला पदावरून पायउतार होण्याची वेळ आणली. सत्तेचा हव्यास माझ्या मनी कधीच नव्हता, आणि असणारही नाही. कारण कर्जतकर मायबाप जनतेने जो आज पर्यंत माझ्यावर ,राऊत परिवारावर मी केलेल्या कामांवर विश्वास ठेवला तोच माझ्यासाठी लाखमोलाचा आहे. आपले सरकार नसताना पुरेसा निधी उपलब्ध नसतानाही मी जनतेच्या हिताची बरेचशी कामे मार्गी लावण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला.

### ही विकासकामे मार्गी लावली

आमदार रोहित पवार व सासरे कर्जत नगरपंचायत प्रथम नगराध्यक्ष नामदेव राऊत यांच्या माध्यमातून नगरपंचायत इमारत, व्यापारी संकुल इमारत, घरकुल योजना, संत गोदड महाराज भक्तनिवास, व सुनंदा पवार यांनी कर्जत शहरातील सर्व सामाजिक संघटना कर्जत यांच्या सहकार्याने माझी वसुंधरा अभियान कर्जत नगरपंचायत राज्यात प्रथम क्रमांक, पाणीपुरवठा, विज आणि अशी कामे आमच्या मार्फत करण्यात आली.

# श्रीगोंदा तालुक्यातील भाजपा मंडल अध्यक्षांच्या निवडी जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यात भाजपा अंतर्गत श्रीगोंदा पूर्व मंडल (कोळगाव, मांडवगण,आढळगाव, जि.प.गट) श्रीगोंदा पश्चिम मंडल (काष्टी, बेलवंडी, येळपणे, जि.प.गट) व श्रीगोंदा मध्य मंडल (श्रीगोंदा शहर) अशी मंडल रचना करण्यात आली असून श्रीगोंदा पूर्व मंडलाच्या मंडल अध्यक्षपदी- डॉ. विक्रम भोसले (कसरे), श्रीगोंदा पश्चिम मंडलाच्या मंडल अध्यक्षपदी- अजित काकडे, व श्रीगोंदा मध्य मंडलाच्या अध्यक्षपदी- धनराज कोथिंबीरे यांची भाजपा प्रदेश पातळीवरून अधिकृत निवड जाहीर करण्यात आली आहे. अशी माहिती तालुकाध्यक्ष संदीप नागवडे यांनी दिली.







मंडल अध्यक्ष निवडण्यासाठी पक्षाकडून निरीक्षक नेमण्यात आले होते. त्यानुसार दि. ७ एप्रिल २०२५ रोजी निरीक्षकांनी सर्व इच्छुकांच्या मुलाखती घेऊन व कार्यकर्ते पदाधिकारी यांचे मत लक्षात घेऊन मंडलनिहाय प्रत्येकी ३ नावांची यादी तयार करून शिफारस प्रदेशाकडे पाठविण्यात आली होती. त्यानुसार वरीलप्रमाणे नावांची घोषणा करण्यात आली आहे. निवड झालेल्या सर्वांचेच माजीमंत्री बबनराव पाचपुते, आमदार विक्रम पाचपुते, डॉ.सौ. प्रतिभा पाचपुते, ॲड. प्रतापसिंह पाचपुते यांसह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी निवडीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व शनिवार दिनांक २६ एप्रिल रोजी सकाळी १० वा. माऊली संपर्क कार्यालय,श्रीगोंदा येथे जाहिर सत्कार आयोजित करण्यात आला आहे. तसेच उर्वरित पदाधिकारी व सक्रिय कार्यकर्ते यांनाही भाजपा कार्यकारीणी मध्ये व तालुका व जिल्हा शासकिय समित्यांमध्ये स्थान देण्यात येणार असल्याचेही संदिप नागवडे म्हणाले.

# आशिष चोरडिया यांचे मरणोत्तर नेत्रदान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : शहरातील व्यापारी आशिष अशोकलाल चोरडिया (वय ४१) यांचे अल्पआजाराने निधन झाल्यानंतर दु:खाच्या प्रसंगातही चोरडीया परिवाराने त्यांचे नेत्रदान करत समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.

जामखेड येथील उद्योगपती अशोकलाल चोरडिया यांचा मुलगा आशिष (वय ४१) यांचे अकाली निधनाने संपुर्ण कुटुंब दु:खसागरात असताना, प्रतिकुल परिस्थितीत आशिष यांचे डोळे दोन जणांना दान करून, वडिल अशोक चोरडिया व त्यांचे जिजाजी रिंकेश संचेती आणि परिवारांनी समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे. आशिष हे मनमिळावू स्वभावाचे होते साधुसंतांच्या विहार दरम्यान ते सतत जात असत तसेच सामाजिक कार्यात ते पुढे होते. त्यांच्या मागे आजी, आई, वडील, पत्नी, एक मुलगा, भाऊ, बहीणी असा परिवार आहे.

# कुस्त्यांनी रंगला बोरदेवी मातेचा यात्रा उत्सव आखाडा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : बोरी गावचे ग्रामदैवत श्री.बोरदेवी मातेचा यात्रा उत्सव १९ आणि २० एप्रिल रोजी उत्साहात पारंपारिक आणि सांस्कृतिक पद्धतीने संपन्न झाला. १९ एप्रिल ला पहाटे तीन वाजता यात्रा उत्सव प्रारंभ झाला, हरिभाऊ सोनवणे यांनी मंदिर सजावट केली होती, हजारो भाविकांनी बोरदेवी मातेचे दर्शन घेतले, दंडवत घेतले, अभिषेक केला, गावातील अनेकांनी देवीच्या नावाने शेरणी वाटली तसेच नवस पूर्ण केले सायंकाळी ठीक ७ वा. भव्य गाडा बगाड हे उत्सवाचे खास आकर्षण ठरले.

कुस्त्याच्या हगामात महाराष्ट्र चॅम्पियन



तुषार सोनवणे, शुभम सोनवणे, काका सोनवणे जयेश थोरात, संतोष सोनवणे, धनंजय वाळुंज, शरद शेळके, दादा शेळके, सुभाष सोनवणे, प्रशांत शेळके, किरण शेळके, उमेश सोनवणे, राहुल शेळके, बाळु वाळुंज, मदन जठार, यांच्या मार्गदर्शनाखाली निकाली कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. शेवटची ५५५५५ ची कुस्तीने आखाड्याची सांगता झाली.

हनुमंत आणि साहेबराव जठार यांनी बोरदेवी केसरी मानाची गदा निकाली कुस्तीसाठी ठेवली होती, पै.आबा शेंडगे यांनी प्रतिस्पर्धी पैलवानला चारी मुंड्या चित करत निकाली फ्रीस्टाइल कुस्ती करून बोरदेवी माता केसरी किताब पटकावला. एकेकाळी पैलवानांचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बोरी गावात पुन्हा एकदा नव्याने ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली. अशी माहिती ग्राम सुरक्षा समिती अध्यक्ष प्रदिप हिवाळे यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

# बिपीन गायकवाड 'भारतीय रत्न' पुरस्काराने सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : नवी दिल्ली येथे ए एन आय प्रिंट न्यूज इंडिया तसेच झी विकिपीडिया,द.फ्रो एन सायक्लोपीडिया यांच्यावतीने डॉ. एपीजे अब्दुल कलाम भारतीय रत्न सन्मान २०२५ या एक विशेष जागतिक सन्मानाने नवी दिल्ली येथे महाराष्ट्र राज्यातील अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील पत्रकार बिपीन चंद्रभान गायकवाड यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल व प्रभावी पत्रकारितेसाठी डॉ. एपीजे अब्दुल कलाम या संस्थेचे संस्थापक मोहन बाजपेयी यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत शुक्रवार दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी एका विशेष कार्यक्रमात जागतिक सन्मानाने सन्मानपत्र ट्रॉफी व मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले

या कार्यक्रमासाठी ए एन आय प्रिंट न्यूज इंडियाचे एक्झिक्युटिव्ह ऑफिसर ओम प्रकाश राका तसेच झी विकिपीडियाचे डायरेक्टर श्रीकांत त्रिपाठी व डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम या संस्थेचे संस्थापक मोहन बाजपेयी यांच्या हस्ते सन्मानित करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या याप्रसंगी उपस्थित अनेक मान्यवरांनी संस्थेच्या कार्य कर्तुत्वाचा आढावा घेत संस्थेच्या मार्फत दरवर्षी विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या



पुरस्कारार्थींचा सन्मान सोहळ्याचे आयोजन केले जातो त्या अनुषंगाने २०२५ या वर्षाचा भारतीय रत्न पुरस्काराने महाराष्ट्र माझा न्युजचे संपादक बिपीन गायकवाड यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांच्या कामाची दखल डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम या संस्थेने घेऊन त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या त्यांच्या निवडीबद्दल अनेक मान्यवरांनी तसेच पत्रकार बंधूंनी व विविध क्षेत्रातील विविध पक्षातील पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छांचा वर्षाव करत पुढिल कार्याला शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेतकऱ्यावर बिबट्याचा प्राणघातक हल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : रांधे येथील शेतकरी सुरेश पंढरीनाथ आवारी हे शेतातील पिकांना पाणी भरण्यासाठी सुरू केलेला वीजपंप बंद करण्यासाठी पहाटे पाच वाजता गेले असता, दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्या दुचाकीवर झेप घेऊन शेतकरी आवारी यांचा पाय जबड्यात पकडून त्यांना जबर जखमी केले. पण जवळ असणाऱ्या श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पहाटच्या अचानक सुरू झालेल्या काकड आरतीच्या ध्वनीमुळे बिबट्याने धूम ठोकली.

शेतकरी सुरेश आवारी यांना वेदना असह्य झाल्यामुळे देवस्थानचे अनिल आवारी यांनी तत्काळ वनरक्षक श्रीहरी आठरे आणि वनरक्षक उमेश खराडे यांना संपर्क केला. त्यानंतर लगेचच वनरक्षक उमेश खराडे आणि वनरक्षक श्रीहरी आठरे हे घटनास्थळी दाखल झाले.

त्यांनी कशाची वाट न पाहता राहुल आवारी यांच्या खाजगी वाहनातून रुग्णास नगर येथील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले. त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहे. बिबट्याने केलेल्या जबरी हल्ल्यामुळे मोठा रक्तश्राव झाला. पण जीवावरचा धोका टळला आहे.

घटनेची माहिती मिळताच भाजपाचे मंडल तालुकाध्यक्ष किसनराव शिंदे , सरपंच संतोष काटे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष भास्कर आवारी,गोरख दत्तू आवारी यांनी भेट दिली.

श्री स्वामी समर्थ देवस्थानचे संस्थापक अनिल रामचंद्र आवारी यांनी खंत व्यक्त केली की, आज अळकुटी आणि पंचक्रोशी मध्ये बिबट्याचा वावर हा मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. बिबट्या आणि इतर हिंस्त्र प्राणी हल्ला झाल्यावर त्यासाठी उपचार म्हणून लागणारे इंजेक्शन घेण्यासाठी ७० किलो मीटर अंतरावरील नगरला जावे लागते. अश्यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडू शकतो. रुग्णाचा जीवही धोक्यात येऊ शकतो. त्यासाठी पारनेर तालुक्यातील आरोग्य खाते हे अधिक सक्षम व परिपूर्ण होणे गरजेचे आहे.

# सरपंचपदाची आज आरक्षण सोडत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाची आरक्षण सोडत दि. २३ एप्रिल तर महिला सरपंच पदाची आरक्षण सोडत दि. २४ एप्रिल रोजी नवीन प्रशासकीय इमारत येथे होणार आहे. श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामपंचायतच्या अनुसूचित जाती-जमाती तसेच नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्व साधारण प्रवर्गासाठी सरपंच पदाचे आरक्षण सन २०२५ ते २०३० साठी रोटेशन पद्धतीने आरक्षित करायचे आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आरक्षण सोडतीच्या तालुकानिहाय वेळापत्रकानुसार तहसीलदार मिलींद कुमार वाघ यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३ एप्रिल रोजी सकाळी १२ वाजता तर महिला सरपंच आरक्षण सोडत दि. २४ एप्रिल रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १२ वाजता नवीन प्रशासकीय इमारत या ठिकाणी होणार आहे. यावेळी तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सरपंचपदाची आज आरक्षण सोडत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण सोडतीसाठी उद्या दि. २३ एप्रिल २०२५ रोजी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. नेवासा तालुक्यातील ग्रामपंचायतच्या अनुसूचित जाती-जमाती, तसेच नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्व साधारण प्रवर्गासाठी सरपंच पदाचे आरक्षण सन २०२५ ते २०३० साठी रोटेशन पद्धतीने आरक्षित करायचे आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आरक्षण सोडतीचे तालुकानिहाय वेळापत्रकानुसार तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा दि. २३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय, नेवासा येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी या सभेसाठी नेवासा तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांनी केले आहे.

# डाळिंबाला १२१ रुपये किलोचा दर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : राहाता बाजार समितीत सोमवारी डाळिंबाला प्रति किलो १२१ रुपयांचा भाव मिळाला. राहाता बाजार समितीत डाळिंबाच्या ३५ कॅरेटची आवक झाली. डाळिंब नंबर एकला ९१ ते १२१ रुपये प्रति किलोला भाव मिळाला. डाळिंब नंबर दोनला ६६ ते ९० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर तीनला ४१ ते ६५ रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर चारला ५ ते ४० रुपये भाव मिळाला. गव्हाच्या चौदा क्विंटलची आवक झाली गव्हाला २५०० ते २६५२ भाव मिळाला तर सरासरी २५७५ रुपये भाव मिळाला. सोयाबीनची दोन क्विंटलची आवक झाली. सोयाबीनला सरासरी ४ हजार १०० रुपये भाव मिळाला. हरभऱ्याचे सात किंटलची आवक झाली. हरभऱ्याला सरासरी ५३९१ रुपये भाव मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली

# बँक जाळणाऱ्या आरोपींना केले गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांची कामगिरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर** : वैजापूर येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत चोरी करण्याचा प्रयत्न व बँक जाळणार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी गजाआड केले आहे.

पोलीस ठाणे वैजापूर येथे दि. २० एप्रिल रोजी फिर्यादी बजरंगलाल जुसालाल ठाका (बँक मॅनेजर) यांनी वैजापूर येथे पोलीस ठाण्याला तक्रारी जबाब दिला की, दि.२० एप्रिल रोजी पहाटे ३ तीन वाजून २४ मिनिटांनी येथील अनोळखी ४ जणांनी बँकेत चोरी करण्याचा प्रयत्न करून लॉक तोडण्यासाठी कशाचा तरी वापर केल्याने बँकेला आग लागली. स्फोट झाल्याने बँकेतील, ग्राहकांचे ठेवलेले एटीएम कार्ड, चेक बुक, डी. डी. बुक, कर्ज फाईल, कॅश वाउचर कॅम्पुटर, फर्निचर व दैनंदिन व्यवहारातील कागदपत्रे जळून खाक झाली. १५ लाख रुपये इतके बँकेचे नुकसान झाले आहे. फिर्यादीवरून वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला होता.

पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखेचे सतीश वाघ यांनी गुन्हे शाखेच्या पथकासह नमूद गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन, गुन्हा उघडकीस आणून कारवाई करण्याची आदेश दिले होते. सदर गुन्ह्याच्या वरिष्ठांच्या आदेशाने दिनांक २० एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन इंगळे यांचे पथक तपास करीत असताना घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळी मिळून आलेली आरोपींच्या स्विफ्ट गाडीची कसून तपासणी केली असता गाडीच्या डिक्की मध्ये वेगवेगळ्या नंबर प्लेट मिळून आल्या. त्या अनुषंगाने माहिती घेतली असता डिकीमध्ये सापडलेली नंबर प्लेट क्रमांक (एम एच ०४ डी डब्ल्यू ४५११) अशी मिळून आल्याने तिचे बाबत पडताळणी केली असता नमूद स्विफ्ट गाडी ही ओम साई ऑटो कन्सटिग मालेगाव जिल्हा नाशिक येथून विक्री झाली असल्याचे



समजले.

यावरून स.पो.नी पवन इंगळे यांचे पथक मालेगाव जिल्हा नाशिक येथे जाऊन त्यांनी नमूद वाहनाची माहिती घेतली असता नमूद ऑटो कन्स्टींग नमूद वा-हनाचे विक्री बाबतच्या डिलिव्हरी चलान मध्ये खरेदी करणाऱ्यांनी नाव व पत्ता व मोबाईल क्रमांक हे चुकीचे दिले असल्याचे आढळून आले. गोपनीय व तांत्रिक माहिती आधारे दिनांक २१ एप्रिल रोजी नमूद इसम नामे अक्षय ज्ञानेश्वर कराळे (वय २८ वर्ष रा. करंजगाव ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजी नगर) याचा शोध घेऊ त्याच ताब्यात घेऊन नमूद घटनेबाबत विचारपूस केली असता त्याने सांगितले की, भरत शिवाजी कदम (रा. विरगाव, वैजापूर) याच्यावर महाराष्ट्र ग्रामीण बँक वैजापूर येथून बनावट कागदपत्राच्या आधारे कर्ज घेतल्या प्रकरणी गुन्हा दाखल आहे. त्याचा राग व बदला घेण्यासाठी ही चोरी केल्याची कबुली दिली.

### या पथकाने बजावली कामगिरी

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री डॉ. विनय कुमार मे राठोड, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती अन्नपूर्णा सिंह मॅडम, यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सतीश वाघ, सह पोलीस निरीक्षक पवन इंगळे, भागिनाथ आहेर, विठ्ठल डोके, वाल्मीक निकम, शिवानंद बनगे, अशोक वाघ, दीपक सुराशे, राहुल गायकवाड, योगेश तरमाळे यांनी केली आहे.

## संपादकीय

# हा द्वेष आवरायला हवा...

रंगाऐवजी मनाने सुंदर असायला पाहिजे. काळा रंग अंधारात दिसत नाही तसेच माणसाचे मन चांगले आहे का नाही हे दिसत नसते. दिसण्यावरून किंवा रंगावरून तुलना करणे हा संबंधिताचा अवमान असतो. त्यांच्या कर्तृत्त्वाला कमी लेखले जाते. सावळा किंवा कृष्णवर्ण म्हटले की आजही नाक मुरडले जाते. दक्षिण आफ्रिकेच्या झोझिबिनी तुंझीमुळे सौंदर्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. ती मिस युनिव्हर्स ठरली आहे. असे असले, तरी केरळच्या मुख्य सचिवांना अलिकडेच ज्या पद्धतीने रंगावरून मानहानीला सामोरे जावे लागले, त्यावरून अजूनही लोक मध्ययुगीन मानसिकतेतून बाहेर आले नाहीत, हे स्पष्ट होते. सौंदर्य पाहणाऱ्याच्या नजरेत आहे, असे म्हणतात. सौंदर्याची ठराविक व्याख्या करता येत नाही. गौरवर्ण, उजळ त्वचा ही आयुष्यात यश मिळवण्याची परिमाणे ठरू शकत नाहीत. त्यासाठी लागते ते कर्तृत्व, धमक, क्षमता आणि कौशल्य. अशा असंख्य कर्तृत्ववान महिला आपल्या आसपास आहेत. त्यांचा परिघ विस्तारलेला आहे. सौंदर्याची ठोकळेबाज परिमाणे त्यांच्या कर्तृत्वाच्या आड कधीही आली नाहीत. या महिलांचा चेहरा नाही, तर काम बोलते. विविध सौंदर्यप्रसाधनांच्या, गोरे बनवणाऱ्या, क्रीम्सच्या जाहिरातींचा सातत्याने मारा होत असतानाही महिलांच्या चेहऱ्यावर झळकणारे त्यांच्या कर्तृत्वाचे, हुशारीचे, बुद्धिमत्तेचे तेज या बेगडी जगाला बरेच काही सांगून जाते. या पार्श्वभूमीवर अजूनही मुख्य सचिव असलेल्या महिलेचे कर्तृत्व पाहण्याऐवजी रंगावरून टिप्पणी केली जात असेल, तर सडकी मानसिकता किती खोलवर रुजली आहे, याचा प्रत्यय येतो. क्रिकेटपटू हरभजन सिंगने 'आयपीएल'च्या कॉमेंट्रीदरम्यान अलिकडेच जोफ्रा आर्चरवर वर्णद्वेषी टिप्पणी केली होती. एका सामन्याप्रसंगी त्याने जोफ्रा आर्चरला ब्लॅक टॅक्सी असे संबोधले होते. या वर्णद्वेषी कॉमेंटनंतर हरभजनला अनेक गोष्टी ऐकाव्या लागल्या. लंडनमध्ये काळी टॅक्सी वेगाने धावते आणि इथे आर्चरसाहेबांचे मीटरही वेगाने धावते, असे त्याने समालोचन करताना म्हटले. हरभजनच्या या वक्तव्यावर 'सोशल मीडिया'वर टीका झाली. त्याला कॉमेंट्री पॅनलमधूनही काढून टाकण्याची मागणी झाली. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील क्रिकेट कसोटी सामन्यादरम्यान क्रिकेट समालोचक इसा गुहाने भारतीय गोलंदाज जसप्रीत बुमराहला 'एमव्हीपी' म्हणून संबोधून चुकीचा शब्द वापरला. त्यावर त्याने दुसऱ्याच दिवशी माफी मागितली. बॉलीवूडमध्येही कृष्णवर्णीय आणि गोरे यांच्यात वाद निर्माण झाले आहेत. फेअरनेस क्रीमच्या प्रमोशनबाबत अभिनेता अभय देओलने एकदा अनेक बड्या स्टार्सवर भाष्य केले होते. यामध्ये त्याने आपल्या 'सोशल मीडिया' पोस्टवर लिहिले होते, की देशातील अनेक कंपन्या काळ्या त्वचेपेक्षा गोरी त्वचा चांगली अशी कल्पना विकत आहेत; पण हे अपमानास्पद, बनावट आणि वर्णद्वेषी आहे.

आता शारदा मुरलीधरन यांना काळ्या रंगावरून डिवचल्यानंतर त्यांनी आपल्या पोस्टमध्ये विचारले की गडद रंगाला वाईट का मानले जाते? काळा रंग हे विश्वाचे सत्य आहे. ते सर्व काही शोषून घेऊ शकते. हे ऊर्जेचे सर्वात शक्तिशाली भजन आहे. काळा रंग गणवेशाचा असतो. काळ्या ढगातून तर पाऊस बरसतो. गोऱ्या मुलाला काळे तिटच लावले जाते. शारदा यांनी लहानपणाची एक गोष्ट संगितली. त्यांनी आईला विचारले होते, की आपल्याला पुन्हा गर्भात ठेवून पुन्हा गोरे करता येईल का? लहानपणापासून त्यांना रंगावरून किती मानहानीला सामोरे जावे लागले असेल, याची ही प्रचिती. लोकांच्या चिडवण्यामुळे त्यांना काळ्या रंगात सौंदर्य आणि मूल्य दिसत नव्हते. त्या गोऱ्या त्वचेकडे आकर्षित झाल्या होत्या. कारण त्यांना वाटत होते, की गोरी त्वचा असलेले लोक चांगले आहेत. त्यामुळे त्यांना त्याची कशी तरी भरपाई करावी लागेल. शारदाजी म्हणतात, भारतात त्वचेच्या रंगाबाबतचे गैरसमज खोल रुजले आहेत. माझी जात सार्वजनिक नसल्याने समाजाच्या जातीय रचनेत मला कोठे ठेवावे याबाबत लोकांमध्ये नेहमीच संभ्रम होता. पहिल्यांदा लोक मी मल्याळी नाही, असे गृहीत धरतात. नंतर माझ्या नावाच्या आधारे त्यांना मी सवर्ण आहे, असे वाटते; पण माझा रंग पाहून ते गोंधळून जातात. शारदा यांची ही टिप्पणी आपल्याकडे कामापेक्षा रंग आणि जातीमध्ये लोकांना किती रस आहे, हे दाखवून देते. नोकरशाहीतही हा भेदभाव दिसून येतो. 'तुम्ही वरच्या पदावर असलात तरी कोण बोलू शकते, कोणाचे ऐकले जाते आणि कोणाकडे दुर्लक्ष केले जाते, हे महत्त्वाचे असते. तुम्ही सत्तेच्या संरचनेच्या शीर्षस्थानी नसाल, तर तुमचा आवाज ऐकायला मिळणे आणखी कठीण होऊन बसते,' ही शारदा यांची प्रतिक्रिया उच्चपदस्थांनाही रंग, रुपावरून कशी मानहानी पत्करावी लागते, हे स्पष्ट करते. भारतीय समाजात गोरी त्वचा ही सुंदर, स्वीकारार्ह आणि कार्यक्षम मानली जाते तर काळी त्वचा असलेल्यांबद्दल नकारात्मक दृष्टिकोन बाळगला जातो. एका व्यक्तीने त्यांच्या त्वचेच्या रंगाबद्दल अपमानास्पद टिप्पणी केली. माझ्या कार्यकाळाला 'काळा' आणि माझ्या पतीच्या कार्यकाळाला 'पांढरा' असे संबोधण्यात आले. म्हणजेच रंगामुळे त्यांचे काम निकृष्ट आणि पतीच्या श्वेतवर्णामुळे त्यांचा कार्यकाळ सर्वोत्तम म्हटले गेले. पती व्ही. वेणू ३१ ऑगस्ट २०२४ रोजी निवृत्त झाल्यानंतर शारदा मुरलीधरन यांनी मुख्य सचिव म्हणून पदभार स्वीकारला. १९९० च्या बॅचच्या आयएएस अधिकारी असलेल्या मुरलीधरन यांनी सरकारी सेवेत अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. कुडुंबश्री बचत गट, ग्रामीण विकास मंत्रालयाच्या राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान आणि पंचायत राज मंत्रालयात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अशा स्थितीत कामावरून मूल्यमापन करण्याऐवजी रंगावरून करणे त्यांना खटकले आणि त्यावर त्यांनी दिलेले उत्तर सर्वांच्या डोळ्यांमध्ये अंजन घालणारे आहे.

# व्यापारयुध्दाचे नवे वळण

**परामर्श**

**– हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार**




अमेरिकेतील स्थानिक जनतेच्या विरोधामुळे शुल्कवाढ रद्द करण्याचे शहाणपण ट्रम्प यांना सुचले असले तरी व्यापारयुद्ध संपलेले नाही. अमेरिकेतील अनेक कंपन्या चीनमध्ये माल बनवत असल्यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती कमी होते; त्याचा फायदा फक्त चीनला होतो, असे ट्रम्प यांचे मत आहे. या आणि अमेरिकेवर लादलेल्या आयात शुल्काच्या मुद्द्यावर त्यांनी आरंभलेले व्यापारयुध्द आता कोणते वळण घेणार, हे पहायचे.

अमेरिकेने बहुतांश देशांवरील आयात शुल्क तीन महिन्यांसाठी थांबवले असून, त्यामध्ये भारताचाही समावेश आहे. जवळजवळ सर्व देशांच्या आयातीवर दहा टक्के शुल्क कायम असेल. परंतु त्या पलीकडील वाढीव कर घेणे मात्र स्थगित करण्यात आले आहे. यामुळे शेअर बाजारात आलेले निराशेचे मळभ ताबडतोब दूर झाले आहे. परंतु चिनी आयातीवरील करदर अमेरिकेने १२५ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. तत्पूर्वी अमेरिकेने चीनवर १०४ टक्के समतुल्य आयातकर लावला होता. त्याला उत्तर म्हणून चीनने अमेरिकेवर ८४ टक्के कर लावला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर आधी ३४% आयातकर लावल्यानंतर चीनने तेवढाच कर लावला! हा कर मागे न घेतल्यास चीनवर ५० टक्के अतिरिक्त आयात कर लावण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला होता. त्यानुसार १०४ टक्के इतका आयात कर आकारला. त्यानंतर हा कर १२५ टक्के करण्यात आला. थोडक्यात, जागतिकीकरणाची चक्रे उलटी फिरवण्याचे ट्रम्प यांनी स्पष्ट केले असून, त्या विरोधात चीन जागतिक व्यापार संघटनेत जाणार आहे. तेथे त्यांनी अगोदरच अमेरिकेच्या विरोधात एक खटलादेखील दाखल केला आहे. अमेरिकेतील स्थानिक जनतेच्या विरोधामुळे ट्रम्पना शहाणपण सुचले असले, तरी व्यापारयुद्ध संपले आहे, असे म्हणता येणार नाही. आपल्या पहिल्या कार्यकाळातही त्यांनी चीनविरोधात अशीच आघाडी उघडली होती. चीन आणि अमेरिका या जगातील मोठ्या अर्थव्यवस्था आहेत. अमेरिकेतील अनेक कंपन्या चीनमध्ये माल बनवतात. त्यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती कमी होते, त्याचा फायदा फक्त चीनला होतो, असे ट्रम्प यांचे मत आहे. त्यातूनच ताजे व्यापारयुध्द सुरु झाले.

चीन असो वा अन्य देश, त्यांनी अमेरिकेत गुंतवणूक करावी, मोठमोठे कारखाने आणि प्रकल्प उभारावेत आणि स्थानिक अमेरिकनांना नोकऱ्या द्याव्यात, असे ट्रम्प यांचे मत आहे. परंतु जागतिकीकरणाच्या अगोदरच्या टप्प्यात अनेक देशांमध्ये हाच विचार प्रचलित होता. साम्यवादी देशांमध्ये तसेच भारतासारख्या देशातही नियंत्रित आणि अनेक बंधने असलेली अर्थव्यवस्था होती. त्यामुळे काय घडले हा इतिहास सर्वज्ञात आहे. साम्यवादी, समाजवादी अथवा मिश्र अर्थव्यवस्था असलेल्या देशांमध्ये सरकारी आणि खाजगी उद्योग कार्यक्षमतेने चालवले गेले नाहीत. उत्पादनक्षमतेचा विस्तार करणे, नवीन क्षेत्रात पदार्पण करणे यावर अनेक बंधने होती. त्याचप्रमाणे आयात-निर्यात व्यापारावर निर्बंध होते. त्यामुळे स्पर्धा कमी झाली आणि अनेक ठिकाणी स्वदेशीच्या नावाखाली केवळ त्या त्या उद्योगांचे लाड पुरवले गेले. देशांतर्गत स्पर्धा कमी आणि विदेशी मालआयातीवर बंधने यामुळे स्थानिक उद्योगपतींनी ग्राहकांची अक्षरशः लूट सुरू केली. भिकार आणि महागडा माल लोकांच्या गळ्यात मारला गेला. अनेक सरकारी व खाजगी सेवांचा दर्जा सुमार होता. सरकारने वर्षं वर्ष कर्मचाऱ्यांची अनेक पदे भरली नाहीत, हेही एक महत्त्वाचे कारण होते. नवनवीन उत्पादने आणणे, वेगळे प्रयोग करणे, मालाची गुणवत्ता सुधारणे आणि किंमत कमी करणे ही प्रक्रियाच मंदावत गेली. आता ट्रम्प यांना 'आत्मनिर्भर अमेरिके'च्या नावाखाली पुन्हा हाच कित्ता गिरवायचा असेल, तर अमेरिकेला कोणीही वाचू शकणार नाही!

एकेकाळी जागतिक व्यापार करारावर भारताने स्वाक्षरी करावी, यासाठी युरोप तसेच अमेरिकेसारखे देश, त्याचप्रमाणे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आग्रही होत्या. आज तीच अमेरिका उघड उघडपणे जागतिकीकरणविरोधी, आर्थिक संरक्षकवाद आणत आहे, तेव्हा भारतासह अनेक देश दिग्मूढ झाले आहेत. अमेरिकन जनतेने रस्त्यावर येऊन ट्रम्प यांना तळ्यावर आणले. परंतु १९९० च्या दशकात सर्व श्रीमंत देश ज्याप्रकारे अमेरिकेच्या मागे उभे होते, तसे चित्र आज नाही. परंतु चीन वगळता अन्य देश अमेरिकेविरोधात तेवढे आक्रमक नाहीत, हेदेखील तितकेच खरे. दुसरे महायुद्ध १९३९ ते १९४५ दरम्यान झाले. महायुद्ध संपत आले, तोपर्यंत जगात मंदी आली होती. त्यातून वाट काढण्यासाठी १९४४ मध्ये ब्रेटनवूड्स येथे एक परिषद झाली आणि १९४७ मध्ये जगातील २३ देशांनी जनरल ॲग्रीमेंट ऑन ट्रेड अँड टॅरिफ, म्हणजेच गॅट करार केला. जागतिक व्यापार नीट चालवावा आणि वेगवेगळ्या देशांनी आयात-निर्यातीवरील निर्बंध सैल करावेत, हा त्यामागील उद्देश होता. पहिल्या करारात ४५ हजार वस्तूंवरील आयात शुल्कात कपात करण्यात आली. त्यामुळे जागतिक व्यापार वाढला. १९४७ नंतर १९७३ पर्यंत झालेल्या प्रत्येक करारात (एकूण सात) आयात शुल्क घटवण्याबद्दलच चर्चा झाली आणि तशी पावले टाकण्यात आली. १९७३ नंतर तेरा वर्षे वाटाघाटीच्या फेऱ्या झाल्याच नाहीत. आठवी फेरी १९८६ मध्ये उरुग्वेमध्ये सुरू झाली. या फेरीत प्रथमच शेती, सेवा, गुंतवणूक आणि पेटंट्स, कॉपीराइट्स वगैरे बौद्धिक संपदा अधिकार या चार नवीन विषयांचा कराराच्या वाटाघाटीत समावेश करण्यात आला.

उरुग्वेची चर्चेची फेरी १९९१ पर्यंत चालली आणि मग डंकेल ड्राफ्ट या नावाने कराराचा एक मसुदा सर्वांसमोर ठेवण्यात आला. त्यावर भरपूर चर्चा झाली. डंकेल प्रस्ताव स्वीकारू नये म्हणून भारतात मुख्यत: डाव्यांनी जोरदार विरोध केला. मोर्चे, परिषदा, चर्चासत्र झाली. परंतु अखेर मोरोक्कोच्या मारकेश येथील परिषदेत १५ एप्रिल १९९४ रोजी सव्वाशे देशांनी या करारावर पसंतीची मोहोर उमटवली. त्यानंतर डब्ल्यूटीओ किंवा वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन ही संस्था स्थापन झाली. एक जानेवारी १९९५ पासून नवीन जागतिक व्यापार कराराची अंमलबजावणी सुरू झाली. भारत गॅटमध्ये असल्यामुळे डब्ल्यूटीओच्या स्थापनेतही भारताची ठळक भूमिका होतीच. डब्ल्यूटी-ओमुळे देशोदेशीच्या व्यापारातील वेगवेगळे अडथळे बाद करण्यात आले. काही एक नियमावली आखून व्यापार सुरू झाला आणि मग सदस्य संख्या १६० पर्यंत पोहोचली. तोपर्यंत भारतासारख्या अनेक देशांमध्ये आर्थिक शिथिलीकरणाची प्रक्रिया सुरू झाली होती. भारतात यूपीएप्रमाणेच एनडीए सरकारनेदेखील उदारीकरणाचा रस्ता कायम ठेवला. एवढेच काय, देवेगौडा आणि गुजराल यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त आघाडी सरकारनेही हा रस्ता बदलला नाही. एकमेकांशी व्यापार करण्यासाठी द्विपक्षीय करार करण्याऐवजी एकाच वेळी अनेक देशांशी जागतिक व्यापार कराराच्या माध्यमातूनच संलग्न होणे शक्य झाले. त्यामुळे भारतात, खास करून पायाभूत सुविधांसाठी लागणारे भांडवल मोठ्या प्रमाणात येऊ लागले. तंत्रज्ञान आले. अनेक भारतीय कंपन्यादेखील बहुराष्ट्रीय झाल्या. शेअर बाजार, बँकिंग, उत्पादन व सेवाक्षेत्र यांचा विकास झाला.

१९९९-२००० पासून, म्हणजे डब्ल्यूटीओच्या तिसऱ्या मंत्री परिषदेपासून अविकसित आणि विकसनशील देशांचे नेतृत्व भारताकडे आले. युरोप, अमेरिका, चीनसारख्या देशांनी लावलेल्या निर्बंधांविरोधात भारताने डब्ल्यूटीओच्या तंटानिवारण यंत्रणेकडे दाद मागितली आणि ती बंधने दूर करण्यास भाग पाडले. म्हणजे डब्ल्यूटीओचे फायदेही झाले. परंतु त्याचबरोबर देशातील एमएसएमई सेक्टर या जागतिक आव्हानापुढे टिकाव धरु शकला नव्हता. तसेच अर्थव्यवस्थेत मेगा कंपन्या आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी प्रस्थापित झाली. आर्थिक विषमता वाढली आणि पर्यावरणाची वाट लागली. विकासाच्या नावाखाली महाकाय प्रकल्प हाती घेताना, होणाऱ्या वनसंपत्तीच्या नाशाकडे दुर्लक्ष झाले. म्हणजे जागतिकीकरणाच्या फायद्याप्रमाणे तोटेदेखील झाले. २००१ मध्ये दोहा येथे 'डब्ल्यूटीओ'ची परिषद होऊन एक विकासाचा अजेंडा संमत करण्यात आला. परंतु अनेक वर्षे त्यावर कार्यवाहीच झाली नाही. गरीब आणि विकसित देशांनी आपल्या बाजारपेठा खुल्या कराव्यात म्हणून नेहमीच दबाव आणला जातो आणि स्वत: प्रगत देश मात्र आपल्या बाजारपेठा त्या प्रमाणात खुल्या करत नाहीत, असा अनुभव आहे. पर्यावरण, ई-कॉमर्स या विषयात डब्ल्यूटीओची भूमिका फारशी प्रभावी ठरलेली नाही. आता चीन, अमेरिका व्यापारयुद्ध तीव्र बनले असून योग्य पावले टाकल्यास भारताला या संधीचा फायदा उचलता येईल. मात्र यापूर्वी भारताने 'आत्मनिर्भर भारत'च्या नावाने नावाखाली असाच आर्थिक संरक्षणवाद जपला. मोदी समर्थक अर्थतज्ज्ञ अरविंद पानगरिया यांनीही त्याला वेळोवेळी विरोध केला. नरेंद्र मोदी यांचे मित्र डोनाल्ड ट्रम्प हे त्याच वाटेने चालू पाहत आहेत, याची नोंद घेतली पाहिजे.

# सहकारमहर्षी थोरात कारखान्याचा आज स्नेहमेळावा

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत स्नेहमेळावा होणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : सहकारातून सर्वसामान्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणारा संगमनेरचा सहकार हा देशासाठी दिशादर्शक ठरला असून मा.महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीमध्ये आज, बुधवार दि. २३ एप्रिल व गुरुवार दि. २४ एप्रिल २०२५ रोजी तालुक्यातील विविध ठिकाणी सभासद शेतकरी युवक व हितचिंतकांचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

थोर स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श तात्यांवर संगमनेरमधील थोरात सहकारी साखर कारखाना व सर्व सहकारी संस्थांचा कारभार हा राज्याला दिशादर्शक ठरला आहे. माजी मंत्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली या सर्व सहकारी संस्थांनी तालुक्याच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम सभासद शेतकरी ऊस उत्पादक कामगार यांचे हित जोपासताना उच्चांकी भाव दिला आहे.

या कारखान्याचा स्वच्छ प्रामाणिक व पारदर्शक कारभार यामुळे सभासद शेतकरी नागरिक युवक महिला यांचा मोठा विश्वास कारखान्याच्या व्यवस्थापनावर आहे. २०२५-३० या वर्षाकरिता होऊ घातलेली निवडणूक ही माजी मंत्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध होण्याकडे वाटचाल सुरू आहे. माजी मंत्री थोरात यांच्या नेतृत्वावर सर्व



तालुक्यातील सुजाण नागरिक, सभासद, शेतकरी, युवक यांचा मोठा विश्वास राहिला आहे.

तालुक्यातील सर्व सभासद शेतकरी युवक महिला व हितचिंतक या सर्वांशी संवाद साधण्याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात व मा.आ.डॉ.सुधीर तांबे व विविध मान्यवर यांच्या उपस्थितीमध्ये बुधवार दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.३० कृष्णा लॉन्स नाशिक-पुणे हायवे गुंजाळवाडी येथे तर सकाळी ११ वाजता साई मंगल कार्यालय समनापुर येथे त्यानंतर सायं. ६ वाजता जय मल्हार लॉन्स आशापीरबाबा रोड निमोन येथे व सायंकाळी ७.३० वा. महाराजा लॉन्स तळेगाव येथे स्नेहसंवाद मेळावा होणार आहे.

यानंतरउद्या, गुरुवारी सकाळी ९ वाजता रिद्धी सिद्धी मंगल कार्यालय जाखुरी येथे व सायंकाळी ६.३० वाजता शिव ओंकार मंगल कार्यालय जोरवे येथे स्नेहसंवाद मेळावा होणार आहे. तरी या स्नेहसंवाद मेळाव्यासाठी थोरात सहकारी साखर कारखान्याचे सर्व सभासद, शेतकरी, युवक, हितचिंतक या सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शेतकरी विकास मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मिरी उपबाजार समितीच्या जागेचा प्रश्न सोडवणार : बर्डे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : पाथर्डी तालुक्यातील मिरी येथे उपबाजार समिती सुरु करण्यासंदर्भात या भागातील शेतकऱ्यांची आग्रही मागणी आहे त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. शिवाजीराव कर्डिले, आ. मोनिका राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली मिरी येथे उपबाजार समिती सुरू करण्यासंदर्भात महसूल विभागाकडे दहा एकर जमीन मागितली आहे.

त्यासाठी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट देखील घेण्यात आली असल्याची माहिती मार्केट कमिटीचे चेअरमन सुभाषराव बर्डे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

गेल्या वर्षभरापासून पाथर्डी मार्केट कमिटीमध्ये अनेक विकासभिमुख उपक्रम हाती घेण्यात आले असून मार्केट कमिटीने दोन कोटी रुपयांची ठेव बँकेत ठेवली आहे. हा महत्त्वाचा स्तुत्य उपक्रम पहिल्यांदाच मार्केटकमिटीने राबवला आहे. तसेच तिसगाव



येथे देखील पहिल्या टप्प्यात दोन कोटी रुपये खर्चाचे शॉपिंग सेंटर उभारले जाणार आहे.

आडते व्यापाऱ्यांना या गाळ्यांच्या माध्यमातून मार्केटमध्ये व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात १५ गाळे उभारले जाणार असून दुसऱ्या टप्प्यात आणखी गाळे उभारले जाणार आहेत. मिरी येथे लवकरच जागा निश्चित करून या ठिकाणी उपबाजार समिती सुरू करण्यासंदर्भात मार्केट कमिटीचे सर्व संचालक प्रयत्नशील असल्याचे चेअरमन बर्डे यांनी सांगितले.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## 'मळगंगा' दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी

गायखे, सारिका गायखे, रुपाली गायखे व पुजारी सुनिल गायखे, ठकाराम गायखे, संतोष गायखे, दादु गायखे यांच्या हस्ते विधीवत पुजा करण्यात आले. हा भक्ती सोहळा भाविक भक्तांनी मातेचा मोठा जयघोष करत याची देही, याची डोळा सहभागी होत पाहिला. यंदा ग्रामस्थांनी श्री मळगंगा माता मंदीर व घागर यावर ड्रोनच्या सहाय्याने पुष्पवृष्टी केल्याने याला अनोखे रूप प्राप्त झाले. ही ड्रोनव्दारे होणारी पुष्पवृष्टी भ्रमणध्वनीत चित्रीत करण्यासाठी भाविक भक्तांची चढाओढ लागली होती. हे पुष्पवृष्टीचे दृश्य नेत्रदिपक व विलोभनीय होते. यंदा पहिल्यांदाच निघोज परिसरातील घागर, मंदीर व मिरवणूक यावर पुष्पवृष्टी झाल्याने भाविक भक्तांनी आनंद व्यक्त केला . तद्नंतर घागर मिरवणूक पेठेतून ग्रामपंचायतीच्या चौकातून मार्गे हेमांडपथीय मातेच्या बारवेजवळ आली. ही मिरवणूक पाहण्यासाठी अफाट जनसमुदाय यावेळी तन, मनाने सहभागी झाला होता. हे या यात्रेचे वैशिष्टे होय. यावेळी भाविक भक्तांनी मोठ्या भक्ती भावाने घागरीचे दर्शन घेत मातेचा जयजयकार करत, फुलांचा व रेवड्यांचा वर्षाव करत सहभाग नोंदवला आणि उधाळलेल्या रेवडीचा प्रसाद भक्ती भावाने सेवन केला. मंगळवार व बुधवार या दोन दिवसांत लाखोंची उलाढाल या ठिकाणी होत असते. बुधवार दि. २३ रोजी दुपारी चार वाजता नामवंत पैलवानांचा कुस्त्यांचा हगामा याठिकाणी होत असून निघोज ग्रामस्थांच्या वतीने लाखो रुपयांची बक्षिसे नामंकीत पैलवानांना देण्यात येणार आहे. या कुस्ती हगाम्याने कुंड यात्रेची सांगता होत असते. सोमवार दि. २१ रोजी सुरू झालेली यात्रा आज बुधवार दि. २३ पर्यंत मोठ्या उत्साहात भरते. तद्नंतर गावात खेळणी, गृहोपयोगी वस्तूंची दुकाने पुन्हा येतात. या संपूर्ण यात्रेचे नियोजन श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंतराव कवाद व त्यांच्या नेतृत्वाखालील विश्वस्त, कर्मचारी, ग्रामपंचायत सरपंच चित्रा सचिन वराळ व सदस्य, कर्मचारी आणि यात्रा कमेटीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके व त्यांचे सहकारी आणि ग्रामस्थांनी योग्य पद्धतीने केल्याने यात्रा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे.

## मंत्री विखेंमुळेच उपसा यंत्रणा कार्यान्वित

क्षेत्रास होतो. डाव्या उच्चस्तरीय कालव्याची लांबी २०.६८ किमी, त्याचे लाभक्षेत्र ८७१ हेक्टर तर उजव्या उच्चस्तरीय कालव्याची लांबी १९.३७ किमी व लाभक्षेत्र १ हजार ४५७ हेक्टर आहे. उच्चस्तरीय पाईप कालवे तलांक ६२७.४० मीटरवरून सुरू होतात. निळवंडे जलाशयाची पूर्ण संचय पातळी तलांक ६४८.१५ मी. आहे. उच्चस्तरीय पाईप कालवा हा तलांक ६३० मी ते ६४८ मी. या गुरुत्वीय दबावाने संकल्पित करण्यात आलेला आहे. म्हणजेच धरणातील पाणीपातळी जेव्हा तलांक ६३० मी. ते ६४८.१५ मी. दरम्यान असते तेव्हाच या उच्चस्तरीय पाईप कालव्यातून पाणी देता येते. पाणीपातळी तलांक ६३० मी. पेक्षा कमी झाली की धरणात पाणी असूनही या कालव्याद्वारे पाणी देता येत नव्हते. मात्र शेतकऱ्यांची समस्या दूर करण्यासाठी मंत्री विखे पाटील यांनी विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना देवून विशेष यंत्रणा कार्यान्वित करण्यास सांगितले होते. त्यानूसार अधिकाऱ्यांनी उच्चस्तरीय कालवे प्रणाली करिता उपसा यंत्रणेची उभारणी करून त्याची यशस्विता सिध्द करून दाखवली आहे.

## शेतीला शाश्वत करण्यासाठी प्रयत्नशील

योग्यवेळी आवश्यक माहिती पुरविणे गरजेचे आहे. कृषी प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन आणि कृषी मूल्य साखळी विकसित करणेही महत्वाचे आहे. अधिक उत्पन्न देणारी आणि पोषणमूल्यांनी भरलेली पिके विकसित करणे हे कुपोषणाला थोपवण्यासाठी आणि अन्न व पोषण सुरक्षेची हमी देण्यासाठी अत्यावश्यक आहे. नवोपक्रम, शिक्षण आणि शाश्वत पद्धतींच्या माध्यमातून भारतीय शेती तिच्या अडचणींवर मात करून यशस्वी होऊ शकते. कृषी पदवीधरांनी विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साह्याने या आव्हानांना सामोरे जाऊन आधुनिक कृषी पद्धती विकसित करावी अशी अपेक्षा राधाकृष्णन यांनी व्यक्त केली. राज्य शासन शेतीतील नवोपक्रम, उद्योजकता आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारे परिसंस्थेचे निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. आर्थिक सहकार्य, प्रशिक्षण आणि पायाभूत सुविधा प्रदान करणाऱ्या विविध कार्यक्रमांद्वारे शेती क्षेत्रातील पुढील नेतृत्व घडविण्याचे प्रयत्न असल्याचेही ते म्हणाले. कृषी क्षेत्राची आणि विद्यापीठाच्या गरजा लक्षात घेण्यासाठी तीन दिवस विद्यापीठात मुक्काम करणार असल्याचे राधाकृष्णन यांनी सांगितले. विद्यापीठाने शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी विविध पिकांच्या जाती आणि तंत्रज्ञान विकसित करण्याचे प्रशंसनीय कार्य केले आहे. डिजिटल शेतीच्या क्षेत्रात विद्यापीठाची झालेली प्रगती ही एक भूषणावह बाब आहे. विद्यापीठाचा हा पुढाकार शेतकरी समुदायापर्यंत विकसित झालेली तंत्रज्ञान आणि माहिती सहज आणि आकर्षक पद्धतीने पोहोचवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे गौरवोद्गार राज्यपालांनी काढले. जिल्हाधिकारी पंकज अशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आशिष येरेकर, अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक राकेश ओला यांच्यासह विद्या परिषदेचे सदस्य व स्नातक यावेळी उपस्थित होते.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# सहकार टिकविण्यासाठी एकत्रित येवून लढाई

## डॉ. सुजय विखे पाटील; विखे कारखान्याच्या संचालकांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : राजकीय मतभेद निवडणुकीनंतर सोडून द्यायचे असतात. गावाचा तसेच परिसराचा आपण एकत्रितपणे विकास करू, परंतु त्यासाठी संपत चाललेली माणुसकी प्रत्येक कोल्हार भगवतीपुर ग्रामस्थांनी जपली पाहिजे व त्यासाठी वेळोवेळी असे स्नेहभोजनाचे कार्यक्रम करणे पूरक असल्याचे मत त्यांनी यवेळी व्यक्त केले. विशेष म्हणजे याप्रसंगी कोल्हार भगवतीपूरचे माजी सरपंच अॅड. सुरेंद्र खर्डे व्यासपीठावर उपस्थित होते.

कोल्हार भगवतीपुर येथे खांदे परिवार व नागपूर पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कार्यकारणी सदस्य



ऋषिकेश खांदे यांनी पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या नूतन संचालकांचा सत्कार तसेच स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता प्रसंगी डॉ. सुजय विखे बोलत होते.

याप्रसंगी प्रवरा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्करराव खर्डे, कोल्हार चे माजी सरपंच अॅड. सुरेंद्र खर्डे, देवालय ट्रस्टचे उपाध्यक्ष साहेबराव दळे, नंदकुमार खांदे, बाबासाहेब दळे, चंद्रभान खर्डे उपस्थित होते. याप्रसंगी पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे बिनविरोध निवड झालेले नूतन संचालक ज्ञानेश्वर खर्डे, श्रीकांत खर्डे, अलका देवकर, बापूसाहेब कडसकर, विजय म्हसे विजय कडू यांचा सत्कार करण्यात आला. नवीन संचालक मंडळा कडुन पद्मश्री विखे पाटील कारखान्याचे नूतनीकरण सुरु करून येणाऱ्या गळीत हंगामात प्रतिदिन १० हजार टन गाळप करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी बोलून दाखविला. सहकार वाचवण्यासाठी सर्वांनी सामंजस्य दाखवून सर्व सभासदांच्या माध्यमातून विखे पाटील कारखान्याची निवडणूक बिनविरोध केल्या बद्दल सर्व सभासदांचे आभार मानत विकास करण्यासाठी सर्वांनी एकत्रित मिळून लढाई करायची असल्याचे मत डॉ. सुजय विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

### डॉ. विखे यांचा केला सत्कार

याप्रसंगी नंदकुमार खांदे, अनिल खांदे, सुनील खांदे, नितीन खांदे, संजय खांदे, ऋषिकेश खांदे, अॅड. अजिंक्य खांदे, विशाल खांदे, हर्षल खांदे, कुणाल खांदे, अमित खांदे यांनी डॉ. सुजय विखे यांच्या डोक्यावर शिंदेशाही पगडी चढवून त्यांचा सन्मान केला. याप्रसंगी कोल्हार भगवतीपुरचे सरपंच दत्तात्रय राजभोज, उपसरपंच प्रकाश खर्डे, स्वप्निल निबे, नितीन कुंकूलोळ, पंढरीनाथ खर्डे, ऋषिकेश खर्डे, धनंजय दळे, केतन लोळगे, अक्षय मोरे उपस्थित होते.

# पिस्तूल रोखत दारु विक्रेत्या महिलेच्या बंगल्यावर दरोडा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अकोले** : अकोले शहरातील परवाना धारक देशी दारू विक्रेत्या काशीबाई म्हातारबा डोंगरे (रा. देवठाण रोड अकोले, वय ७६) व त्यांच्या मुलीस सोफा व खुर्चीला दोरीने बांधून तोंडाला चिकट टेप लावून चॉपर व पिस्तूल रोखत जीवे मारण्याची धमकी देत चार इसमांनी २,२९,००० रुपयांच्या मुद्देमालासह रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबत अकोले पोलिसांत काशीबाई डोंगरे यांनी फिर्याद दिली असून त्यात म्हटले की, दि १८ एप्रि २०२५ रोजी पहाटे सव्वा पाच वाजेपासून ते सकाळी ११-३० वाजेच्या दरम्यान डोंगरे निवास, देवठाण रोड, मॉर्डन हायस्कूल जवळ अकोले येथील बंगल्यात फिर्यादी असताना आरोपी ओमकार शेटे (पूर्ण नाव माहीत नाही), निखिल चौधरी (पूर्ण नाव व पत्ता माहीत नाही), प्रभाकर भिमाजी वाकचौरे (राहणार नवलेवाडी, तालुका अकोले) व बाहेरी एक अज्ञात इसम यांनी फिर्यादी यांच्या घरी येऊन काशीबाई व त्यांची मुलगी राणी हिस सुती दोरीने सोफा व खुर्चीला बांधून ठेऊन तिच्या तोंडाला चिकट टेप लावला. या फिर्यादीवरून अकोले पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पो.नि. मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी खांडबहाले करत आहेत. आरोपीच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे व पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांनी घटनास्थळी भेट दिली आहे.

### हा मुद्देमाल गेला चोरीला

या दोघींकडून घरातील वस्तुंची माहिती घेऊन माहिती न दिल्यास मारहाण करून चॉपर व पिस्तूल रोखत जीवे मारण्याची धमकी देत घरातील कागदपत्रे, बँकेचे सह्या असलेले कोरे चेक, बँकेच्या लॉकरची चावी, सोन्याचे दागिने, मोबाईल व अॅक्टिवा स्कुटी आणि रोख रक्कम असा एकूण अंदाजे २,२९,००० रुपयांचा मुद्देमाल व रोख रक्कम बळजबरीने आरोपींनी चोरून नेला.

# मनपाच्या कामात ई प्रणालीमुळे गतिमानता

## आयुक्त डांगे : नागरिकांचा वेळ वाचल्याचा दावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महापालिकेने गेल्या दोन महिन्यांपासून प्रशासकीय कामकाजासाठी ई ऑफीस प्रणालीचा वापर सुरू केला आहे. बहुतांश कामकाज, प्रस्ताव, पत्रव्यवहार या प्रणालीद्वारे सुरू आहे. त्यातून काम काजात गतिमानता येत आहे.

एप्रिलपासून संपूर्ण कामकाज या प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. लवकरच नागरी सुविधा, तक्रारीसाठीही ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यातून नागरिकांचा वेळ वाचून तक्रारींचा निपटारा होईल, असा विश्वास आयुक्त यशवंत डांगे यांनी व्यक्त केला. आयुक्त डांगे म्हणाले, मनपा प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत ई-ऑफिस प्रणाली यशस्वीरित्या कार्यान्वित केली आहे. या प्रणालीमुळे मनपातील प्रशासकीय कामकाज सुलभ, पारदर्शक आणि गतिमान झाले आहे. यात दस्तऐवजांची देवाणघेवाण, फायलींचे ट्रॅकिंग, निर्णय प्रक्रियेतील गती आणि जबाबदारीत लक्षणीय सुधारणा झाली. यामळे कागदांचा वापर कमी झाल्याने सर्व विभागप्रमुखांना दिवसभरातील सर्व फाईल त्याच दिवशी निकाली काढणे बंधनकारक आहे. यात हलगर्जीपणा झाल्यास कारवाई केली जाता आहे. नागरिकांच्या तक्रारी, सूचना व विविध सुविधा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्याचे नियोजन सुरू आहे.

### १०० टक्के डिजीटलचे उद्दीष्ट

सध्या महापालिकेच्या अधिकृत या फेसबुक व इन्स्टाग्राम पेजवर नोंदवलेल्या तक्रारींवर कार्यवाही केली जात आहे. महापालिकेने १०० टक्के डिजिटल प्रणालीचा वापर सुरू करण्याचे उद्दिष्ट निश्चित केल्याचे आयुक्त डांगे यांनी सांगितले. प्रणाली पर्यावरणपूरक ठरली आहे. वेळेची बचत, कार्यक्षम संवाद आणि फायलींवरील नियंत्रण वाढल्याने प्रशासनाची कार्यशैली परिणामकारक झाली आहे.

# अतिक्रमण हटवण्याबाबतचे उपोषण स्थगित



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : तालुक्यातील समसूद एरंडगाव येथील ग्रामपंचायत हद्दीतील सरसकट अतिक्रमण काढण्यासाठी समसूद एरंडगाव येथील नागरिकाचे आमरण उपोषण पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.

त्यांनी दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की राजकीय दोषापोटी ठराविक नागरिक, व्यवसायिकांना ग्रामपंचायत कडून नोटीसा देण्यात आल्या आहेत. येथील नागरिकांनी अशी मागणी केली आहे की ग्रामपंचायत हद्दीतील खुली जागा ज्यांनी धरलेली आहे. तसेच ज्या नागरिकांनी ग्रामपंचायत हद्दीमध्ये अनधिकृत बांधकाम केलेले आहे. त्या सर्व अतिक्रमण धारकांना नोटीसा बजावण्यात याव्यात. तसेच सर्व नागरिकांना सामान्य हक्क देण्यात यावा, यासाठी हे उपोषण करण्यात आले होते. त्यावेळी उमेश धस, संदीप धस, जयराम धस, राजेंद्र धस, प्रकाश मगर, अंकुश करून, बापू भिडे, उत्तम गजभिव, गंगा भाऊ खेडकर, अशोकराव लोंढे आदि ग्राम स्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहुरी तालुक्यातील ४० वर्षीय महिलेचा विनयभंग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी तालुक्यात एका ४० वर्षीय महिलेकडे वाईट नजरेने पाहून अश्लिल संवाद करत लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याची घटना घडली आहे. याबाबत कुक्कडवेढे येथील तरूणावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आहे.

काल सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास पीडित महिला शेतामध्ये कलींगड तोडीत होती. त्यावेळी आरोपी त्याठिकाणी आला व पीडित महिलेशी अश्लिल भाषेत संवाद करून महिलेचा हात धरत तिला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

तसेच तिला ओढत गिन्नी गवताकडे नेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पीडित महिलेने आरोपीच्या हाताला झटका देऊन पळण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आरोपीने महिलेला शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करून धमकी दिली. पीडित महिलेच्या फिर्यादीवरून आरोपी संतोष तबाजी जगदाळे (रा. कुक्कडवेढे) याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ७४, ११५ (२), ३५२,३५१ (२) प्रमाणे मारहाण व विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# 'अमृतवाहिनी निडो' केंब्रिज विद्यापीठाच्या परीक्षांचे केंद्र

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : शरयू ताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर जिल्ह्यातील केंब्रिज विद्यापीठाची संलग्न झालेल्या संगम नेर मधील अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूल ला गुणवत्तेमुळे राज्य पातळीवर विविध मानांकने मिळाली असून केंब्रिज विद्यापीठाच्या पहिली ते दहावी मधील विविध परीक्षांसाठीचे अधिकृत केंद्र म्हणून निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य अंजली कन्नावार यांनी दिली आहे.

केंब्रिज अभ्यासक्रमासाठी इयत्ता पहिली ते दहावी विविध परीक्षांचे आयोजन होत असते यामध्ये चेक पॉइंट, निम्न माध्यमिक तपासणी केंद्र आयजीसीएसइ आणि ए स्तरावरील परीक्षा होणार आहे. इंग्लिश अडवांटेज केंब्रिज इंग्रजी पात्रता प्रि ए १ स्टार्टर्स, ए १ मुव्हर्स, ए-२ फ्लायर्स, ए २की २ फर्स्ट अँड सी १




ऍडव्हान्स युके महाविद्यालयीन बोर्ड ६३५०१ प्रामाणिक चाचण्या ज्या युनायटेड अमेरिका आणि कॅनडामधील विद्यालयीन प्रवेशासाठी अत्यंत आवश्यक आहेत अशा प्राथमिक सॅट नॅशनल मेरिट स्कॉलरशिप टेस्ट स्कालिटीस असाइन्मेंट टेस्ट ऍडव्हान्स प्लेसमेंट याबाबत परीक्षा घेतल्या जातात.

केंब्रिज विद्यापीठांतर्गत असलेल्या सर्व परीक्षांचे अधिकृत केंद्र म्हणून अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूलची निवड झाली असून या परीक्षांसाठी नाशिक अहिल्यानगर पुणे येथील अनेक विद्यार्थी सॅट परीक्षेसाठी दाखल होऊ लागले आहेत. अत्यंत निसर्गरम्य व गुणवत्तापूर्ण असलेल्या अमृतवाहिनीच्या वातावरणात या सर्व विद्यार्थ्यांना अमृतवाहिनी कडून सातत्याने मार्गदर्शन केले जाते.

### प्रवेशासाठी सॅट चाचणी आवश्यक

सॅट ही शैक्षणिक मूल्यांकन चाचणी आहे, जी महाविद्यालयीन मंडळाने पद-वीधर कार्यक्रमांच्या प्रवेशासाठी निश्चित केली आहे.सॅट परीक्षेचे निकाल ४८ हून अधिक देश व ४००० विद्यापीठांनी स्वीकारले आहे. अमेरिकेमधील अनेक महाविद्यालय आणि विद्यापीठांमध्ये घेतली जाते तसेच ही परीक्षा मे जून ऑगस्ट सप्टेंबर डिसेंबर मध्ये आठ वेळा आठवड्याच्या शेवटी घेतली जाते.

# बेलापूर बु. ग्रामपंचायतीवर साळवी यांची निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेलापूर** : तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्वाच्या बेलापूर बु ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी नामदार राधाकृष्ण विखे पा. व माजी खा. डॉ. सुजय विखे पा. यांचे नेतृत्वाखालील तसेच जि. परिषद सदस्य शरद नवले व बाजार समितीचे उपसभापती अभिषेक खंडागळे यांचे मार्गदर्शनाखालील गावकरी मंडळाच्या मिनाताई अरविंद साळवी यांची बिनविरोध निवड झाली.



माजी सरपंच स्वाती अमोलिक यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी निवडणुक अधिकारी व्हि. एस. गवारी (मंडलाधिकारी) यांचे अध्यक्षतेखाली, तलाठी व्हि. एच. खेमनर व ग्रामविकास अधिकारी निलेश लहारे यांचे उपस्थितीत ग्रामपंचायत सदस्यांची बैठक संपन्न झाली. सरपंच पदासाठी गावकरी मंडळाच्या मिनाताई साळवी यांचा एकमेव अर्ज आला. विरोधी सुधीर नवले, रविन्द्र खटोड व भरत साळुंके यांचे नेतृत्वाखालील जनता विकास आघाडीने निवडणुकीतून माघार घेतली. बैठकीस गावकरी मंडळाच्या माजी सरपंच स्वाती अमोलिक, उपसरपंच प्रियंका कुऱ्हे, सदस्य अभिषेक खंडागळे, मुश्ताक शेख, तबसुम बागवान, चंद्रकांत नवले, वैभव कुऱ्हे, उज्वला कुताळ, सुशिलाबाई पवार उपस्थित होते. तर सुधीर नवले,भरत साळुंके,रविंद्र खटोड यांचे नेतृत्वाखालील जनता विकास आघाडीचे सदस्य अनुपस्थित राहिले. त्यामुळे मिनाताई साळवी यांच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब झाले. निवडीनंतर झालेल्या आभार सभेत जि. परिषद सदस्य शरद नवले म्हणाले की, गावकरी मंडळाने सरपंच पदाबाबत जो शब्द दिला आहे तो पाळला आहे. यापुढील काळात प्रवरा घाट विकास पर्यटन केन्द्र,गाव अंतर्गत रस्ते, सेंन्द्रिय खत प्रकल्प, बाराशे घरकुलांचे संकुल,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केन्द्र आदी प्रश्न मार्गी लावायचे आहेत. आजच्या बिनविरोध निवडीने विरोधकांचे मनसुबे उधळले गेले आहेत. गावकरी मंडळात फूट पडावी यासाठी देव पाण्यात बुडवून बसलेल्या विरोधकांना गावकरी मंडळाने ऐक्यातून चपराक दिली.

### सरपंच पदासाठी आज आरक्षण सोडत

**कोपरगाव** : कोपरगाव तालुक्यात सन २०२५ ते २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या कोपरगाव तालुक्यातील ७५ ग्रामपंचायतीच्या आरक्षणासाठी २३ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता तहसिल कार्यालय, कोपरगाव येथे तहसीलदार महेश सावंत यांच्या अध्यक्षतेखाली तर २४ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता उप विभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महिला आरक्षण सोडत आयोजित करण्यात आली असल्याची माहिती कोपरगावचे तहसीलदार महेश सावंत यांनी दिली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिलनगर** : महाराष्ट्र सरकारने विधानसभेत मांडलेल्या महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक क्रमांक ३३ विरोधात आयटक, भाकप आणि जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. हे विधेयक नक्षलवाद्यांच्या विरोधात नसून, संविधानाच्या चौकटीत काम करणाऱ्या संघटना व कार्यकर्त्यांवर दडपशाही करण्यासाठी असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.



या आंदोलनात विविध सामाजिक, कामगार व नागरी हक्कासाठी लढणाऱ्या संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या वेळी जोरदार घोषणाबाजी करत विधेयक त्वरित रद्द करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनात भाकपचे जिल्हा सचिव कॉ. अॅड. बन्सी सातपुते, आयटकचे राज्य उपाध्यक्ष अॅड. कॉ. सुधीर टोकेकर,अशोक सब्बन, अर्शद शेख, कॉ. सतिश पवार, सुभाष शिंदे, कॉ. बबन सालके, कॉ. संतोष खोडदे, कॉ. बेबी राऊत, आप्पासाहेब वाबळे, कॉ. रामदास वागस्कर, वीरबहादूर प्रजापती, कॉ. सुभाष कडलग, नलिनी गायकवाड, दीपक पापडेजा, भारती न्यालपेल्ली, संगीता कोंडा, रवी सातपुते, सगुणा श्रीमल, कॉ. मुनोत, अविनाश साठे, कॉ. सोमनाथ केंदले, विलास मिसाळ, संदीप सकट, कॉ. उमाप आदींसह भ्रष्टाचार निर्मूलन, पीस फाउंडेशन, आम आदमी पार्टी सहभागी झाले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विधेयकाचे उद्दिष्ट शहरी नक्षलवादाचा बंदोबस्त असे सांगितले असले तरी, विधेयकात नक्षलवाद किंवा शहरी नक्षलवाद हे शब्दच नाहीत. बेकायदेशीर कृत्य आणि ते करणाऱ्या बेकायदेशीर संघटना असा अत्यंत अस्पष्ट व मोघम अशी व्याख्या केलेली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांपासून ते संविधानिक अधिकारांसाठी लढणाऱ्या संघटनांपर्यंत कोणालाही लक्ष्य करता येईल, अशी भीती आंदोलकांनी व्यक्त केली.

# उपजिल्हा रुग्णालयाची मानवाधिकार आयोगाकडून पाहणी

## सेवा-अभावाच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर दौरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : राज्य मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष ए. एम. ब्रदर यांनी मंगळवारी पाथर्डी येथील उपजिल्हा रुग्णालयाची अचानक पाहणी करून तेथील सुविधांची व कामकाजाची तपासणी केली. सामाजिक कार्यकर्ते अनिल हरेर आणि शहानवाज शेख यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली.

तक्रारीत उपजिल्हा रुग्णालयात सेवा-सुविधांचा अभाव, रिक्त पदे, औषधांचा तुटवडा व कार्यक्षमतेचा अभाव याकडे लक्ष वेधण्यात आले होते.



यासंदर्भात अध्यक्ष ब्रदर यांनी सर्व विभागांची पाहणी करून सविस्तर माहिती घेतली. त्यांनी सांगितले की, तक्रारीतील मुद्द्यांची गांभीर्याने नोंद घेण्यात आली असून, लवकरच अहवाल सादर करून संबंधित आरोग्य यंत्रणेला नोटीस बजावण्यात येईल. रुग्णालयातील सोयी-सुविधा सुधारण्यासाठी प्रयत्न केले जातील.हरेर आणि शेख यांनी निवेदनात नमूद केले की, गेल्या पन्नास वर्षांपासून आम्ही या परिसरात राहतो. आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गासाठी हे रुग्णालयच एकमेव आधार आहे. मात्र येथे सेवा समाधानकारक नाही. अत्याधुनिक मशिनरी असूनही त्यांचा योग्य वापर होत नाही. औषधांचा तुटवडा, रिक्त पदे आणि गैरहजर कर्मचारी यामुळे रुग्णांची मोठी गैरसोय होते.अध्यक्षांच्या दौऱ्यामुळे रुग्णालय प्रशासन खडबडून जागे झाले असून, अनेक दिवस बंद असलेले एक्स-रे विभाग तत्काळ सुरू करण्यात आला. इतर विभागांतही तत्काळ हालचाली सुरू झाल्या. नागरिकांनी यावेळी अध्यक्षांना आवाहन केले की, ''साहेब, तुम्ही वारंवार अशी पाहणी करावी. तुमच्या उपस्थितीमुळे यंत्रणा कार्यरत झाली, मात्र नंतर पुन्हा स्थिती पूर्ववत होईल, हीच भीती आहे.या पाहणी दरम्यान सामाजिक कार्यकर्ते अनिल हरेर, शहानवाज शेख, अरविंद सोनटक्के, शन्नो पठाण, गोविंद तरटे, कुमार कराड यांनीही रुग्णालयातील समस्या मांडल्या. अध्यक्षांनी सर्व मुद्दे समजून घेत तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन दरंदले उपस्थित होते.

पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयातील गैरकारभार आणि आर्थिक अनियमिततेबाबत आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या तक्रारींच्या फाईलमध्ये गंभीर घोटाळ्यांचे दस्तऐवज असल्याचे समजते. या तक्रारींची चौकशी सुरू असून, आयोगाचा निर्णय काय होतो, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# अतिक्रमणमुक्त करण्यासह हरित श्रीरामपूर शहरासाठी कटिबद्ध

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील; श्रीरामपूर येथे विकासकामांचा पालकमंत्र्यांकडून आढावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : येत्या काळात श्रीरामपूर शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी, शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी उपाययोजना करण्यासोबत शहर हरित करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

श्रीरामपूर येथे तालुक्यातील ग्रामीण पाणीपुरवठा, जलजीवन मिशन व महावितरण विभागांच्या कामकाजाचा आढावा बैठकीत

> जलजीवन मिशनचे काम करताना पाण्याचे स्त्रोत शोधल्यानंतर पाईप खरेदी करावी. उन्हापासून पाइप खराब होऊ नयेत यासाठी पाईप बंदीस्त ठिकाणी ठेवावेत. जलजीवन मिशनच्या कामात गुणवत्ता ठेवावी. कामात अनियमितता करणाऱ्या ठेकेदारांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.
>
> – **राधाकृष्ण विखे पाटील,** पालकमंत्री

विखे पाटील बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंता सुनंदा नरवाडे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, तहसीलदार मिलिंद वाघ आदी उपस्थित होते.

पाणी पुरवठा योजनेच्या अंम लबजावणीबाबत ग्रामस्थांच्या तक्रारींची प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन निकृष्ट कामांची, अनियमितेची चौकशी करण्यात यावी.

> शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळाली पाहिजे यासाठी मुख्यमंत्री सौर पंप योजनेत येत्या काळात सर्वच शेतकऱ्यांना सोलर पंप देण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री सौर वाहिनी योजनेत सौर फिडर केंद्रांसाठी जिल्ह्यात ३ हजार एकर शासकीय जमीन देण्यात आली आहे. कुसुम आणि मागेल त्याला सोलर पंप या योजनेंतर्गत अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ सोलर पंप वितरित करण्यात यावेत, अशा सूचनाही महावितरण कामांचा आढावा घेतांना पालकमंत्री विखे पाटील यांनी दिल्या.

त्रुटींची दुरूस्ती करून पाणी पुरवठा योजना तात्काळ पूर्ण कराव्यात. ज्या गावांना पाणीपुरवठा योजना सुरू आहेत त्या गावांना टँकरद्वारे पाणी पुरविण्याची गरज पडू नये, असेही त्यांनी सांगितले.

तालुक्यातील नादुरुस्त उपकेंद्रांची तात्काळ दुरूस्ती करण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. जिल्ह्यातील महावितरणच्या प्रलंबित कामांना जिल्हा नियोजन निधीच्या



माध्यमातून ४० कोटी रूपयांचा निधी देण्यात आल्याची माहिती पालकमंत्र्यांनी दिली.

गावठाण जमिनीवर असलेले घरकुल नियमित करण्याचे शासनाचे धोरण आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत राज्यात २० लाख घरकुले बांधण्यात येणार आहेत. यासर्व घरांना सोलरद्वारे विज दिली जाणार आहे. श्रीरामपूर तालुक्यासाठी जास्तीत जास्त घरकुले मंजूर करण्यात येतील, अशी ग्वाही श्री.विखे पाटील यांनी दिली. ग्रामीण पाणीपुरवठा व महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरणाच्या योजनेत तालुक्यातील गावां मध्ये करण्यात येणाऱ्या कामांच्या प्रगतीचा पालकमंत्र्यांनी गावनिहाय आढावा घेतला. या बैठकीला महसूल, पंचायत समिती, ग्रामीण रस्ते, जलसंधारण अशा विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

---

# गहिनीनाथ महाराजांसह गणपत आढावांचे पूजन

## उत्साही व आनंदी वातावरणात नर्मदा माता परिक्रमा पूर्ण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भातकुडगाव फाटा** : शेवगाव-नेवासा राजमार्गावरील भातकुडगाव फाट्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या भायगाव येथील भूमिपुत्र असलेले श्रीक्षेत्र नेवासा येथील ज्ञानदीप वारकरी शिक्षण संस्थेचे प्रमुख हभप भागवताचार्य गहिनीनाथ महाराज आढाव व भायगाव विकास सेवा संस्थेचे माजी चेअरमन गणपत आढाव पाटील यांनी नुकतीच माँ नर्मदा मातीची परिक्रमापूर्ण केले.

त्यानिमित्ताने ग्रामस्थांच्या वतीने एका घरगुती कार्यक्रमात या दोघांचेही संत पूजन करून फुलांची उधळण करत यथोचित सन्मान करण्यात आला. गहिनीनाथ महाराज यांनी साडेतीन महिन्यात तर गणपत आढाव पाटील यांनी

> जीवनात नर्मदा परिक्रमा अवश्य केली पाहिजे, अतिशय प्रसन्न व चांगल्या वातावरणात यात्रा संपन्न करता आली. प्रवासाच्या काळात मठ मंदिरे व साधू संतांच्या आश्रमामधील होत असलेले अन्नदान व त्या त्या परिसरातील भाविकासह नागरिकांकडून मिळत गेलेले प्रोत्साहन व माँ नर्मदेचा आशीर्वाद व त्यातून मिळालेली ऊर्जा यामुळेच यात्रा सहज पूर्ण करता आली. याचे समाधान आहे. सुखी व समृद्ध जीवनासाठी हाच माता नर्मदेचा प्रसाद आहे.
>
> **– गणपत आढाव**

चार महिन्यात ही परिक्रमा पूर्ण केली. श्रीक्षेत्र ओंकारेश्वर येथून पारंपारिक पूजा विधि करून पुन्हा याच ठिकाणी श्री ओंकारेश्वरचे दर्शन घेऊन माँ नर्मदा माता परिक्रमा पूर्ण केली.

या काळात ओंकारेश्वर (मध्य प्रदेश) नीलकंठेश्वर, अमरकंटक, गरुडेश्वर, कुबेर भांडार यासह अनेक तीर्थक्षेत्रासह साधु संतांच्या मठ व मंदिरे तसेच साधना आश्रमांना भेटी देत मोठ्या उत्साही व आनंदी वातावरणात यात्रा संपन्न केली. या काळात कुठेही कशाचीही कमतरता भासली नाही. जीवनात सुख शांती व समाधान प्राप्त करायचे असल्यास धर्म ग्रंथात सांगितल्याप्रमाणे माँ नर्मदा मातेची परिक्रमा केल्यास जीवनात सकारात्मक विचारांची वाढ होऊन जीवन समृद्ध होते. अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या पुढील काळातही आपण नर्मदा परिक्रमा करण्यास उत्साही



असल्याचेही यावेळी त्यांनी बोलून दाखवले.याच काळात गावातील हरिचंद्र घाडगे, पंढरीनाथ आढाव व तुकाराम आढाव यांनीही नर्मदा परिक्रमा केली आहे.

यावेळी अविनाश महाराज लोखंडे, महेश महाराज शेळके, भाऊसाहेब महाराज शेकडे, राजेंद्र महाराज आसने, बाळासाहेब काळे, हरिचंद्र आढाव, बापूराव दुकळे, शिवाजी लांडे, संजय लांडे, विठ्ठल प्रल्हाद आढाव, रामहरी ढोरकुले, आजिनाथ लांडे, सुदाम खंडागळे, कैलास लांडे, राजेंद्र दुकळे, अमोल आगळे, हरिश्चंद्र कानडे, राम किसन आढाव, पांडुरंग आढाव, बाळासाहेब लांडे, रंगनाथ आढाव,गणेश शेळके, रमेश काळे, दत्तू आगळे, अशोक नेव्हल, विठ्ठल गांगुर्डे, शहाराम आगळे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# ९२ ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे आरक्षण सोडत जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतीच्या बिगर अनुसूचित क्षेत्रातील सन २०२५ ते २०३० या कालावधी करिता सरपंच पदाचे आरक्षण दि. २३ एप्रिल रोजी दुपारी बारा वाजता पंचायत समितीच्या सभागृह याठिकाणी सोडत पद्धतीने काढण्यात येणार आहे, यानंतर २५ एप्रिल रोजी याम धील महिलांचे आरक्षण सोडत पद्धतीने काढण्यात येणार आहे, अशी माहिती तहसीलदार गुरु बिराजदार यांनी पत्रकारांना दिली.

यावेळी त्यांनी सांगितले की, शासनाच्या पाच मार्च २०२५ रोजी चे पत्र व जिल्हाधिकारी यांचा सतरा एप्रिल रोजी काढण्यात आलेला आदेश यानुसार कर्ज तालुक्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्राम

> ९२ ग्रामपंचायतीची आरक्षणाची सोडत २३ तारखेला दुपारी बारा वाजता तहसीलदार गुरु बिराजदार यांच्या उपस्थितीमध्ये सोडत पद्धतीने काढण्यात येणार आहे. तर उपविभागीय अधिकारी नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली २५ तारखेला महिलांचे सरपंच पदाचे आरक्षण सोडत पद्धतीने काढण्यात येणार आहे.
>
> **– गुरु बिराजदार, तहसीलदार**

पंचायती करिता सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहे.

तथापि ५ मार्च २० ते ४ मार्च २०२५ या कालावधीमधील मुदत संपणाऱ्या ग्राम पंचायतीकरता जानेवारी २०२१ मध्ये सरपंच आरक्षण काढण्यात आलेले आहे त्यानुसार तालुक्यातील १९ ग्राम पंचायतीच्या निवडणुका या त्या आरक्षणा नुसार होणार आहेत.

तालुक्यातील एकूण ९२ ग्रामपंचायतीसाठी अनुसूचित आरक्षित सरपंचाची पदे ११ असून यापैकी महिलांसाठी सहा पदे राखीव आहे अनुसूचित जमाती यासाठी दोन पदे राखीव असून यामध्ये एक महिलेसाठी आहे. नागरिकांचा मागास प्रवर्ग या पदासाठी २५ ग्राम पंचायती असून त्यापैकी १३ महिलांसाठी राखीव आहे खुल्या प्रवर्गासाठी ५४ ग्रामपंचायती असून त्यामध्ये २७ महिलांसाठी राखीव आहे यामुळे ५० टक्कर आरक्षण नुसार तालुक्यातील ९२ ग्रामपंचायती पैकी ४७ ग्रामपंचायतीतील सरपंच पदे महिलांसाठी आहेत.

---

# ... आता गाव तिथे नवीन शाखा : पोटफोडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : सर्वसामान्य शेतकरी, गोरगरीब माणसासाठी जनशक्तीचे काम कधीच थांबणार नाही. उलट आता गाव तिथे जनशक्तीच्या नवीन रूपात शाखा दिसतील असे प्रतिपादन जनशक्तीचे कार्याध्यक्ष कॉ. राम पोटफोडे यांनी केले.

जनशक्तीचे संस्थापक ॲड शिवाजीराव काकडे यांच्या वाढदिवसाचे अवचित्य साधून बऱ्हाणपूर येथे जनशक्तीची नवीन शाखा सुरू करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तालुका उपाध्यक्ष लक्ष्मण गवळी हे होते.

यावेळी तालुका सचिव भारत भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली जनशक्तीचे बऱ्हाणपूर शाखा अध्यक्ष म्हणून विष्णू दिवटे, उपाध्यक्ष अशोक भालेराव, सचिव रामेश्वर डोंगरे, कार्याध्यक्ष आदिनाथ वाणी, सदस्य म्हणून ओंकार वाणी, दीपक भालेराव, अभिषेक

> सर्वसामान्य नागरिकांच्या छोट्या छोट्या समस्या असतात त्यांच्यासाठी त्यांना शासकीय कार्यालयामध्ये चकरा माराव्या लागतात. त्यांना आता कुणी वाली राहिलेला नाही. आपल्या गावातील जनशक्तीच्या सदस्यांनी आजपासून गावातील कोणत्याही नागरिकांच्या समस्येसाठी धावून जायचे आहे. जनशक्तीची स्थापना करण्याचा उद्देशच तो आहे.
>
> **– कॉ. राम पोटफोडे**

दिवटे, अशोक वाणी, महेश दिवटे यांची बऱ्हाणपूर कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यावेळी राम पोटफोडे, राजेंद्र फलके, लक्ष्मण गवळी, अकबर शेख, रामदास डोंगरे, रमेश दिवटे, अंबादास दिवटे, सुनील खरात, लक्ष्मण वाणी, अंकुश भालेराव, प्रभाकर वाणी, माधव वाणी, अंबादास दिवटे, भाऊराव डोंगरे, वामन



वाणी, नारायण चव्हाण आधी यावेळी प्रमुख उपस्थितीत होते.

लक्ष्मण गवळी म्हणाले की, इथून पुढे शांत बसायचे दिवस संपले आहेत. सर्वांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेऊन गावच्या विकासासाठी एकी ठेवा. गावचा विकास हा गावातील नागरिकच करत असतात. त्यामुळे संघटनेच्या सदस्यांनी आपापसात एकी ठेवून गावातील प्रश्नांवर आवाज उठवावा. यावेळी अंबादास दिवटे, विष्णू दिवटे आदींची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र फलके यांनी तर भारत भालेराव यांनी आभार मानले.

---

# निळवंडे धरणास मधुकरराव पिचड यांचे नाव द्या

## यशवंतराव आभाळे; निळवंडे धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : अकोले तालुक्यासह उत्तर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या निळवंडे धरणाच्या निर्मिती मध्ये माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे सर्वात मोठे योगदान असून त्यांनी या धरणासाठी आपली सर्व राजकीय कारकिर्द यासाठी खर्च करून अकोलेसह


> आशिया खंडात एकाच धरणाला चार कालवे असलेले हे एकमेव धरण असून या धरणाला पिचड पॅटर्न म्हणून ओळखले जाते .कारण या धरणाच्या निर्मिती मध्ये सर्वात मोठे योगदान,पाठपुरावा करण्यात माजी मंत्री मधूकररावजी पिचड यांचा सिंहाचा वाटा आहे.

> अकोलेसह संगमनेर, राहाता तालुक्यातील अनेक वर्षे तहानलेली गावे पाण्याखाली आली असून ही गावे आता बागायती होतांना दिसत आहे. आज या निळवंडे धरणावर वीज निर्मिती प्रकल्प चालू आहे. धरणग्रस्तांचें योग्य पुनर्वसन करण्यात आलेले आहे. धरणग्रस्तांच्या व प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना शासकीय,निम शासकीय, सहकारी क्षेत्रात नोकऱ्या मिळवून दिलेल्या आहेत.

अनेक तालुक्यांचा पाणी प्रश्न सोडविलेला आहे.

त्यामुळे या निळवंडे धरणास जलनायक मधुकररावजी पिचड यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी निळवंडे धरणग्रस्त कृती समितीचे सचिव तथा भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष यशवंतराव आभाळे यांनी केली आहे.

भाजप पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजप तालुका सरचिटणीस राहूल देशमुख, उपाध्यक्ष सोमनाथ पवार, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी सुधाकर



देशमुख, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, तालुका सरचिटणीस मच्छिंद्र मंडलिक, राजेंद्र डावरे, खंडू बाबा वाकचौरे, अशोकराव आवारी, प्रतीक वाकचौरे, विवेक चौधरी, दगडू हासे, बाळासाहेब सावंत, रमेश राक्षे, रोहिदास वाल्हेकर, महेश काळे आदीसह अनेक प्रकल्पग्रस्त शेतकरी उपस्थित होते.

यशवंतराव आभाळे म्हणाले की, अकोले तालुक्यासह उत्तर नगर जिल्ह्याला वरदान ठरलेले निळवंडे धरण हे अकोले तालुक्यातील एक महत्वपूर्ण धरण आहे.या निळवंडे धरणाच्या निर्मितीला ५० पेक्षा जास्त वर्षाचा इतिहास आहे. या निळवंडे धरणाची जागा निश्चित करण्यापासून निळवंडे धरण निर्मिती होइपर्यंत अनेक अडथळे,अडचणी निर्माण होऊन सुद्धा हे धरण एक राज्याला नव्हेतर देशाला दिशा देणारे आदर्श धरण म्हणून ओळखले जाते आणि दुसरी बाजू म्हणजे आधी पुनर्वसन मग धरण असे धोरण घेऊन निर्मिती झालेले हे धरण आदर्श पुनर्वसन झालेले धरण होय. या निळवंडे धरणास पिचड यांचे नाव देण्यात अशी मागणी सर्व धरणग्रस्त आणि लाभार्थी यांच्या वतीने निळवंडे धरणग्रस्त कृती समिती व अकोले तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने यशवंतराव आभाळे यांनी यावेळी केली. अशा आशयाचे विनंती पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना वपाठविले असल्याची माहिती त्यांनी दिली.

---

# श्रीगोंद्यातील सरपंचपदाची उद्या आरक्षण सोडत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील सरपंच निवडणुक नियम १९६४ च्या नियम २ अ नुसार मा. जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचेकडील आदेश क्र. ग्रापं/कार्या/८/१९०/२०२५, दि. १७ एप्रिल २०२५ नुसार सन २०२५ ते २०३० साठी होणाऱ्या श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिकनिवडणुकांसाठी सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करावे.



दि. २३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी बारा वाजता नगरपरिषद कम्युनिटी हॉल पंत नगर श्रीगोंदा तहसिलदार श्रीगोंदा (आरक्षण सोडतीचे प्राधिकृत अधिकारी) व दि. २४ एप्रिल २०२५ रोजी बारा वाजता उपविभागीय अधिकारी भाग श्रीगोंदा पारनेर (महिला आरक्षण सोडतीचे प्राधिकृत अधिकारी) यांच्या अध्यक्षतेखाली सोडत बैठकिचे आयोजन केले आहे. नागरिकांनी आरक्षण सोडत बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन तहसीलदार श्रीगोंदा यांनी केले आहे.

---

# काळानुरूप अद्ययावतीकरण करणे आवश्यक

## सभापती राम शिंदे; विधानभवनातील प्रस्तावित कामांच्या आढावा बैठकीत निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नागपूर** : विधानभवनाच्या भविष्यातील गरजा लक्षात घेता यात काळानुरूप अद्ययावतीकरण करणे आवश्यक आहे. यात पर्यावरण पुरक सुविधा, सर्वसमावेशक नियोजन यावर भर देत सर्व कामांची कालमर्यादेत कार्यवाही करण्याचे निर्देश विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिले.

विधानभवन नागपूर येथील प्रस्तावित कामे व सद्यस्थितीत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी काल विधानभवनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला विधानसभा सभापती ॲड. राहुल नार्वेकर दूरदृश्यप्रणालीद्वारे तर विधिमंडळाचे सचिव १ जितेंद्र भोळे, सचिव-३ विलास आठवले, सहसचिव तथा विशेष कार्य अधिकारी ऋतुराज कुडतरकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता जनार्दन भानुसे, मुख्य अभियंता दिनेश नंदनवार यांच्यासह संबंधित कार्यान्वयन यंत्रणेचे प्रमुख उपस्थित होते.

नागपुरातील आमदार निवास येथे व्यापक बदल आवश्यक आहेत. याचा अनेक काळापासून विस्तार झालेला नाही. येथील पूर्ण एफएसआय

> सिव्हिल लाईन्स परिसरातील १६० खोल्याचे बांधकाम अनेक वर्षांपूर्वी झाले आहे. या ठिकाणी पूर्ण एफएसआय वापरून बांधकाम करण्याचे नियोजन आहे. हिवाळी अधिवेशनासाठी येणारे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या गरजा लक्षात घेता निवासव्यवस्थेत सुसूत्रता येण्याची गरज आहे. विधिमंडळाची इमारत वर्षभर सुस्थितीत राहावी यासाठी देखभाल दुरुस्तीचा सुधारित प्रस्ताव सादर। करा.
>
> – **राम शिंदे,** विधानपरिषद सभापती

> हिवाळी अधिवेशनासाठी प्रशासकीय व विधिमंडळ कामकाजाच्या दृष्टीने सन्माननीय मंत्री तसेच राज्यमंत्री यांच्यासाठी कार्यालयीन दालनाची गरज लक्षात घेतली पाहिजे. यात आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत सुलभता असणे आवश्यक आहे. हे सर्व काम येत्या अधिवेशनापूर्वी कसे होतील यावर आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली. आवश्यकतेप्रमाणे तात्पुरती दालने व व्यवस्था करण्यात यावी.
>
> – **ॲड. राहुल नार्वेकर,** अध्यक्ष विधानसभा

वापरून आमदार निवासाचा विस्तार करण्याचा प्रस्ताव



सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

आमदार निवास आणि विधानभवन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येतात. प्रशासकीय कामात सुसूत्रता यावी यासाठी ही ठिकाणे विधिमंडळाच्या अखत्यारित असण्याची गरज आहे. यासाठीची तत्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश सभापती शिंदे यांनी यावेळी दिले.

बैठकीपूर्वी विधानपरिषद सभापती राम शिंदे यांनी आज शासकीय मुद्रणालय, १६० गाळे, आमदार निवास, विधानभवन परिसराची पाहणी केली.

---

# चितपट कुस्त्यांनी यात्रोत्सवाची सांगता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द** : श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त तमनर आखाडा येथे भव्य निकाली जंगी कुस्ती मैदानाचे आयोजन श्री हनुमान जन्मोत्सव आयोजन कमिटी, भजनी मंडळ व तमनर आखाडा ग्रामस्थ तर्फे दि. १२ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ४ ते ८ यावेळी करण्यात आले. या मैदानात तमनर आखाडा केसरी २०२५ या मानाच्या कुस्तीसाठी आयोजन कमिटीच्या वतीने मानाची चांदीची गदा व रोख रक्कम रुपये २१ हजार ठेवण्यात आले.

या मैदानात एकूण ७० कुस्त्या लावण्यात आल्या असून त्यास चांगले बक्षीस देण्यात आली आणि तमनर आखाडा केस री २०२५ या कीताबासाठी डोंगरी विकास तालीम मांडवे बु. वस्ताद सुभाष बिडगर यांचा पट्टा पैलवान अवी शिंदे यांनी अवघ्या २५ सेकंदात निकाल या डावावर कुस्ती चितपट करून तमनर आखाडा केसरी २०२५ हा किताब आयोजन कमिटीच्या वतीने मानाची चांदीचे गदा व रोख रक्कम २१ हजार रुपये देण्यात आली.

श्री हनुमान जन्मोत्सव आयोजन कमिटीच्या वतीने पै. पंढरीनाथ तमनर, प्रा. संजय तमनर, गंगाधर तमनर, भानुदास तमनर, रामदास तमनर, शरद तमनर, पै. संतोष तमनर, बाळासाहेब बाचकर, लक्ष्मण तमनर यांनी दिली.

# सौरभ शिरसाठ विद्यापीठ संघात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : प्रवरा कृषि शास्त्र संस्थेतील सौरभ शिरसाठ याची आचार्य नरेंद्र देवा कृषी विद्यापीठ, अयोध्या येथे होणाऱ्या बाविसाव्या अखिल भारतीय आंतर कृषी विद्यापीठ स्पर्धेसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ , राहुरीच्या मुलांच्या कबड्डी संघात निवड झाली असल्याची माहिती कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. दिलीप महाले यांनी दिली आहे.

सदर स्पर्धा दिनांक २ ते ५ मे दरम्यान उत्तर प्रदेश मधील अयोध्या येथे होणार आहे.

सौरभ शिरसाठ याचा प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. दिलीप महाले, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.निलेश दळे, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष शिरसागर आदी उपस्थित होते.त्यास क्रीडा संचालक प्रा. सिताराम वरखड यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रवरा कृषी शास्त्र संस्थेच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा ना.राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालिनीताई विखे पाटील, माजी खा.डॉ. सुजयदादा विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील,अतिरिक्त मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ.शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे, प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक प्रा.डॉ. उत्तमराव कदम आदींनी अभिनंदन केले.

# महिपती महाराज मंदिराचा कलशारोहन सोहळा

## विविध प्रवचनकार व किर्तनकार यांची सेवा होणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : श्रीसंत कवी महिपती महाराज मंदिराचा कलशारोहन सोहळा यानिमित्त महाविष्णू याग व भव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन सोमवार, दि. २८ एप्रिल ते दि. १ मे २०२५ या कालावधीत श्रीक्षेत्र ताहाराबाद (ता.राहुरी) येथे करण्यात आले असून या सोहळ्यासाठी तन-मन-धनाने सहकार्य करण्याचे आवाहन श्रीसंत कवी महिपती महाराज देवस्थान व ताहाराबाद ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



श्रीसंत कवी महिपती महाराज देवस्थानचे मठाधिपती महंत अर्जुन महाराज तनपुरे, नाना महाराज गागरे, बाळकृष्ण महाराज कांबळे यांचे मार्गदर्शनाने तसेच महाराष्ट्रातील थोर संत महात्म्याच्या प्रमुख उपस्थितीत व भाविक भक्तांच्या सहकार्याने सोमवार, दि. २८ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या कलशारोहन सोहळ्यानिमित्त महंत दत्तगिरीजी महाराज, महंत उध्दव महाराज मंडलीक यांची प्रवचन सेवा तर मुकुंद महाराज जाटदेवळेकर, ज्ञानेश्वर महाराज कदम (मोठे माऊली), ह.भ.प. कान्होबा महाराज देहूकर यांची किर्तनसेवा होणार आहे. बुधवार, दि.३० एप्रिल रोजी अक्षय्यतृतीयेच्या शुभमुहूर्तावर सकाळी ९ वा. देवगड देवस्थानचे महंत भास्करगिरी महाराज, देविदास महाराज म्हस्के, तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, लक्ष्मण महाराज पांचाळ यांचे शुभहस्ते होणार असून दु. ४ वा. श्रीक्षेत्र सरलाबेटचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांची यज्ञ पूर्णाहूती व प्रवचन सेवा होईल. गुरूवार, दि.१ मे. रोजी सकाळी ९ वा. श्रीक्षेत्र डोंगरगणचे महंत पुंडलीक महाराज जंगलेशास्त्री यांचे काल्याचे किर्तन होवून तद्नंतर महा प्रसादाचा कार्यक्रम होवून सोहळ्याची सांगता होणार आहे.

या भव्य दिव्य कलशारोहन, महाविष्णू याग व किर्तन महोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी चालू असून या सोहळ्यासाठी राजकीय, सामाजिक, धार्मिक तसेच सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी तन-मन-धनाने सहकार्य करावे, असे आवाहन संत कवी महिपती महाराज देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

### सोहळ्याची वैशिष्ट्ये

श्रीसंतकवी महिपती महाराजांनी २८४ संतांचे चरित्र वर्णन केले त्यानुसार यज्ञासाठी २८४ यजमान बसविण्यात येणार आहे. रोज किर्तनासाठी २८४ टाळकरी, तुकाराम महाराज चरित्र पारायणाची २८४ वाचक, कलशारोहण मि रवणूकीत २८४ कलश घेवून माता-भगिणी, २८४ पताका तसेच २८४ मृदंगवादकांची उपस्थित असणार आहेत. महिपती नावाच्या व्यक्तींचा विशेष सन्मान करण्यात येईल. व सोहळा काळात आमटी भाकरीचे अखंड अन्नदान सुरू असणार आहे.

# ग्रामपंचायतीला डॉ. आंबेडकर जयंतीचा विसर

## संबंधितांवर कारवाईची करण्याची रिपाइंची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर** : मौजे टाकळी (कदिम) येथील ग्रामपंचायत कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी न केल्याच्या निषेधार्थ रिपब्लिकन सेनेच्या शिष्टमंडळाने गंगापूरचे तहसीलदार व गटविकास अधिकारी यांची भेट घेऊन संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी करत निवेदन सादर केले.

शिष्टमंडळाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, टाकळी येथील ग्रामसेवक ज्ञानेश्वर शहाणे, तलाठी श्रीमती कापडणीस आणि प्रशासक यांनी राज्य शासन व केंद्र शासनाच्या स्पष्ट आदेशांनंतरही जाणीवपूर्वक आणि जातीय द्वेषाच्या भावनेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली नाही. केवळ इतकेच नव्हे, तर ग्रामपंचायत कार्यालयात लावलेले महापुरुषांचे फोटो कपाट्यांवर फेकले गेले असून, त्याऐवजी देशात जातीय तेढ निर्माण करणाऱ्यांचे फोटो कार्यालयात लावले गेले आहेत, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे.या प्रकारामुळे संविधानाचा अपमान झाला असून, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर देशद्रोह, अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (अॅट्रॉसिटी अॅक्ट) आणि इतर संबंधित कायद्यांन्वये गुन्हे दाखल करून तात्काळ सेवा समाप्तीची मागणी रिपब्लिकन सेनेने केली आहे.या शिष्टमंडळात मराठवाडा अध्यक्ष मा. मिलिंद बनसोडे, जिल्हा महासचिव बबन साठे, जिल्हा सचिव बाबा भिवसाने, तालुका अध्यक्ष आनंद भिवसाने,शहराध्यक्षअब्बूचाहूस,शहरउपप्रमुख सुनील पांडे, जिल्हा संघटक योगेश दाणे आणि अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.



# मंदिरांसाठी भरीव निधी देणार: आ.कर्डिले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील निंभेरे येथील मंदिरांना भरीव निधी देणार असल्याचे प्रतिपादन आ. शिवाजीराव कर्डिले यांनी केले. निंभेरे येथे महादेव काशी विश्वेश्वर, श्री साईबाबा, श्री बागेश्वर बालाजी (बजरंग बली) प्राणप्रतिष्ठा व कलशरोहण कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. यावेळी कर्डिले बोलत होते.



कलशरोहण कार्यक्रमानिमित्त निंभेरे गावातून कलश मिरवणूक काढण्यात आली होती. तीन दिवसाच्या कार्यक्रमांमध्ये ह. भ. प. सदुरू आचार्य संदीपजी महाराज धर्म यांच्या हस्ते ध्वज अनावरण करण्यात आले. एकनाथ महाराज सांगोलकर, नरेंद्र महाराज गुरव यांची किर्तनसेवा पार पडली. उद्धव महाराज मंडलिक यांच्या काल्याच्या किर्तनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण प्रसंगी मार्गदर्शक भागवताचार्य सुनील महाराज सोनवणे, मनोहर महाराज सिनारे, आकाश महाराज हारदे कार्यक्रमाचे आयोजक डॉ. अशोक साबळे, पंढरीनाथ तांदळे, आमदार शिवाजीराव कर्डिले, पो. नि. ठेंगे, शिवशाहीर विजय तनपुरे, सभापती विश्वासआबा कोहकडे, राहुल गवारे, निर्मलाताई नवले, कारेगाव सरपंच सुनिलशेठ ओस्तवाल, युवा उद्योजक बलराज डुकरे, सरपंच शांताराम सिनारे, अमोल ढेपे, यमुना जी आघाव, जिल्हा बँकेचे संचालक दादासाहेब वाणी, आकाश महाराज सिनरे , शाखाधिकारी अमोल हारदे, राजेंद्र साबळे, किशोर साबळे,ज्ञानदेव साबळे, पत्रकार सोमनाथ डोळे, भारत गीते आदी उपस्थित होते.

# शांतता समितीची बैठक का होत नाहीत-वहाडणे

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोपरगाव** : कोपरगाव शहरात कायमस्वरूपी शांतता व सुव्यवस्था रहावी यासाठी नियमितपणे शहरात शांतता समितीची मिटिंग होणे अत्यंत गरजेचे असूनही मात्र तसे होत नाही हे दुर्दैवच म्हणावे लागेल. अशी खंत माजी नगराध्यक्षा विजय वहाडणे यांनी व्यक्त केली आहे. जयंती, पुण्यतिथी, धार्मिक असे कार्यक्रम शांततेत, व्हावेत यासाठी वेळोवेळी शहरातील सर्व पक्षीय-सर्व धार्मियांचे नेते-कार्यकर्ते तसेच सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते यांचेसह बैठक न घेता वेळोवेळी काही ठराविक जातीच्या किंवा धर्माच्या ठराविक नेते व कार्यकर्त्यांना बोलावून बैठका होतात. मात्र सर्व धर्मियांना एकत्रित बोलावून सर्वसमावेशक मीटिंग होत नसल्याने एकमेकांबद्दलचे समज-गैरसमज-म्हणणे-वाद मांडलेच जात नाहीत. त्यामुळे अनेक विषयावर असलेले वाद-संघर्ष आतल्या आत घुमसत रहातात व एखाद्या दिवशी, एखाद्या सार्वजनिक कार्यक्रम-उत्सवात त्या असंतोषाचा स्पोट होतो हे कोपरगावकरांनी अनेकदा अनुभवले आहे.

काही नेते स्वतःला फार मोठे विचारवंत किंवा मीच फार मोठा आहे. असे समजून कुणाशीही विचारविनिमय-चर्चा न करता कोपरगाव बंदही पुकारतात. मात्र हातावर पोट भरणाऱ्यांचे त्यामध्ये मोठ्या प्रमाणात हाल होतात. सर्वात जास्त नुकसान लहान मोठ्या व्यापाऱ्यांचे- दुकानदारांचे होते. त्यामुळे शहरात अनेक अपप्रवृत्ती बळावत चालली आहे. त्या अनुषंगाने कोपरगाव शहरात गुन्हेगारी वाढून कायदा व शांतता तसेच सुव्यवस्थेचा प्रश्न निम र्ाण होत आहे याच वातावरणाचा फायदा घेऊन अनेक अवैध व्यवसाय करणाऱ्यांकडून हप्ते बाजी करणारेही समाजसेवक म्हणून सध्या मिरवताना दिसून येत आहे हे ही एक कटूसत्य आहे.

# शिक्षणोत्सव ऐतिहासिक करण्याचा निर्धार

## बांधखडक येथील कार्यक्रमास दिग्गजांची उपस्थिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या मिशन आपुलकी या उपक्रमांतर्गत आणि पं.स.जाम खेड शिक्षण विभागाच्या सहकार्याने जि.प.प्रा.शाळा बांधखडक येथ तीन दिवसीय शिक्षणोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्यात पुढीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित केले आहेत.

शनिवार दि. २६ एप्रिल रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत 'आनंदी बाजार' यानंतर मराठवाड्याच्या आधुनिक बहिणाबाई शशिकला गुंजाळ (वांगी ता.भूम जि.धाराशिव), प्रतिभावंत ग्रामीण साहित्यिक सुवर्णा तेली (सांगोला जि. सोलापूर), प्रगतशील कृषिकन्या सोनाली जाधव (नांदूरघाट ता.केज जि.बीड), महसूल सहायकपदी निवड झालेल्या सोनल फरांडे (जामखेड) व मुंबई पोलीसपदी निवड झालेल्या कु. राधिका बडे (बाळगव्हाण) यांच्या प्रमुख उपस्थितीत स्त्री सक्षमीकरणावर आधारित 'आम्ही सावित्रीच्या लेकी' हा ज्ञान व मनोरंजनात्मक कार्यक्रम आणि भव्य लकी ड्रॉ तर रात्री संत साहित्याचे अभ्यासक तथा साक्षेपी समिक्षक डॉ. ज्ञानेश्वर थोरात (मंचर जि.पुणे)यांचे अध्यक्षतेखाली प्रसिद्ध वक्ते धर्मराज करपे (गेवराई जि.बीड) यांचे व्याख्यान संपन्न होईल.रविवारी सकाळी १० वा. मृद व जलसंधारण विभागाचे महाराष्ट्र राज्याचे माजी सचिव सुनील चव्हाण (भा.प्र.से.)यांचे अध्यक्षतेखाली तसेच पुणे येथे उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत असलेल्या श्रीम. काजल भट यांच्या शुभहस्ते तालुक्यातील जि.प.शाळांतील विविध शासकीय स्पर्धांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ संपन्न होणार आहे. तर याच दिवशी सायं.६:३० वा. देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) येथील महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक ह.भ.प.श्री.ज्ञानेश्वर म.झगरे गुरूजी वाकदकर यांचे सामाजिक व शैक्षणिक जनजागृतीपर राष्ट्रीय कीर्तन होईल.



### विविध गुणदर्शन कार्यक्रम

सोमवार दि.२८ एप्रिल रोजी सायं.७ वा.जामखेड तालुक्याचे गटविकास अधिकारी श्री.शुभम जाधव यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जामखेडचे गटशिक्षणाधिकारी श्री.विजय शेवाळे , शिक्षण विस्तार अधिकारी श्री.जालिंदर खताळ व नायगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.सुरेश मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत बांधखडक शाळेतील विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शन (गॅदरिंग) कार्यक्रमाने शिक्षणोत्सवाची सांगता होईल.

# शेतकऱ्यावर व्यापाऱ्याचा लोखंडी गजाने हल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी आठवडा बाजारात मिरची विक्रीसाठी आलेल्या एका शेतकऱ्यावर व्यापाऱ्याने लोखंडी गजाने हल्ला केल्याची धक्कादायक घटना पाथर्डी येथे घडली. यामध्ये शेतकरी विजय रंगनाथ वायकर व त्यांचे भाऊ राजेंद्र वायकर( रा. माळीबाभुळगाव) हे जखमी झाले आहेत.घटनेची माहिती अशी की, दि. ९ एप्रिल रोजी सकाळी साडे अकरा वाजेच्या सुमारास विजय वायकर हे आपल्या शेतातील लाल मिरचीच्या विक्रीसाठी पाथर्डी येथील आठवडा बाजारात आले होते. त्यांनी व्यापारी महम्मद कादरभाई शेख (रा. चिंचपर रोड, पाथर्डी) यांना मिरच्या ठोक भावाने विकल्या. मात्र, विक्रीनंतर पैसे मागितल्याने कादरभाई शेख हे संतापले व त्यांनी शेजारी पडलेला लोखंडी गज उचलून विजय वायकर यांच्या उजव्या हाताच्या अंगठ्यावर व पाठीवर मारहाण केली. विजय यांना वाचवण्यासाठी त्यांचे बंधू राजेंद्र वायकर मध्ये आले असता त्यांच्यावरही डाव्या हाताच्या पंजावर हल्ला करण्यात आला. याचवेळी बाजारात उपस्थित असलेल्या व्यापाऱ्याचे पाच ते सहा अनोळखी नातेवाईकांनी देखील दोघांवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली व ''पुन्हा पैसे मागितलेस तर जीवे मारून टाकू'' अशी धमकी दिली.या घटनेनंतर वायकर बंधूंनी पाथर्डी पोलिस स्टेशनमध्ये हजर होऊन गुन्हा दाखल केला आहे.

# शेवगाव येथे इज्तेमाई ख़त्ना शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : येथील उम्मीद सोशल फाऊंडेशन यांच्या वतीने मदीना फंक्शन हॉल नाईकवाडी मोहल्ला येथे शनिवार दि. १९ एप्रिल रोजी इज्तेमाई ख़त्ना शिबिराचे आयोजन उम्मीद सोशल फाऊंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष वसिमभाई मुजावर यांनी केले होते. या इज्तेमाई ख़त्ना शिबिराचे उद्घाटन सिफान शेख या लहान मुलांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मौलाना हाफिज आबेद साहब हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून हाफिज मुश्ताक, हाफिज इलियास, हाफिज मुन्नवर, यासिन, अंजुम, फिरोजखान पठाण, इरफानभाई पटेल, समिरभाई मसालेवाले, चांदभाई वडुले, जाकीरभाई दहिफळ, छबुदादा मुडलिक, सलिमभाई दस्तगीर, अरबाज शेख आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आबेद हाफीज़ साहब यांनी दुआ करून कार्यक्रमची सुरुवात केली. तसेच या कार्यक्रमास शेवगांवसह अहिल्यानगर, बीड, छत्रपती संभाजीनगर, पुणे, जालना, परभणी या सर्व जिल्ह्यातुन १४६ मुलांनी इज्तेमाई ख़त्नाचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शफिक मन्सुरी यांनी केले तर हबीब मुजावर यांनी आभार मांनले.





# पुणतांबा गावातील रस्ते काळोखात

## अनेक पथदिवे बंद; ग्रामपंचायतीचा मनमानी कारभार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणतांबा** : गावातील काही प्रभागात पथदिवे बंद असल्यामुळे अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे. ग्रामपंचायतकडे वारंवार तक्रार करून देखील याकडे दुर्लक्ष झाल्याबद्दल ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

प्रभाग तीनमध्ये पुरोहित किरण सराळकर यांच्या घरासमोरील पथदिवे बंद असल्याने अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे. याबाबत ग्रामपंचायत प्रशासनाकडे तक्रार करून देखील दखल घेतली नाही.



ग्रामपंचायतच्या कारभाराबाबत ग्रामस्थांमध्ये नाराजी असून ग्रामपंचायतच्या प्रशासनाच्या कामाबद्दल कर्मचाऱ्यांचा वचक राहिला नाही रामभरोसे कारभार चालू आहे का? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांनी उपस्थित केलाय. ग्रामपंचायतचे पथदिव्यांचे काम ठेकेदार पद्धतीने दिल्याचे समजते. कर्मचारी ऐकत नाही अशी उत्तरे ग्रामस्थांना दिली जातात. वीज, पाणी ही मूलभूत कामे ग्रामपंचायतने करणे आवश्यक आहे. दुर्लक्ष केल्यामुळे ग्रामपंचायतचा प्रशासनावर वचक राहिला नाही हे दिसून येते.

ग्रामपंचायतची कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडी देखील अनेक प्रभागात दहा ते बारा दिवसातून येते. त्यामुळे कचऱ्याचे ढीग साचून ठेवले जातात. या घंटागाडीवर कायमस्वरूपी चालक नसल्याचे समजते. ग्राम पंचायत सदस्य अक्षय सोमवंशी यांनी देखील याबाबत सरपंच उपसरपंच यांच्याकडे तक्रार केली. परंतु त्याच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या मनमानी कारभाराला जनता वैतागली आहे.

# दिव्यांगांना पाच टक्के निधीचे वाटप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**बालमटाकळी** : शेवगाव तालुक्यातील खाना-पूर ग्रामपंचायत येथे मंगळवार दि. २२ रोजी ग्राम पंचायतीच्या पाच टक्के निधीतून दिव्यांगांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. सन २०२४-२५ मधील दिव्यांगांचा पाच टक्के निधी उपलब्ध होता तर त्या मध्ये दिव्यांगांना किराणा किट वाटप करण्यात आले. किराणा किट वाटप झाल्यामुळे दिव्यांग लाभार्थी यांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित झाला होता.

लाभ मिळाल्यामुळे दिव्यांग लाभार्थी व त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने खानापूर ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य यांचे आभार मानण्यात आले. यावेळी मंगेश थोरात, उपसरपंच योगेश चेडे पाटील, माजी उपसरपंच एकनाथराव जगधने, दादाभाऊ मोरे, पै. लक्ष्मण चेडे, संतोष साळुंके, रामदास गोरे, तात्यासाहेब थोरात, सुरेश थोरात, दीपक दळे, देवराव भागवत, दिनकर थोरात, त्रिंबक चेडे, तळेकर भाऊसाहेब, राम आव्हाड, अंकुश थोरात, वसंत जगधने, मारुती थोरात, निलेश जगधने, लक्ष्मण लिंबोरे यांच्यासह आदी ग्रामस्थ दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अस्मिता

## सुमैयाचे ध्यासपर्व

पश्चिम बंगालमध्ये राहणाऱ्या सुमैया परवीन व्यवसायाने वकील आहेत. गेल्या दोन वर्षांपासून कोणतेही शुल्क न आकारता त्या ॲसिड हल्ल्यातील पीडितांचे खटले लढवत आहेत. तसेच सामाजिक कार्यकर्ता या नात्याने मानवी तस्करीवरही त्यांचे उल्लेखनीय काम सुरू आहे. आजच्या काळात या कामाचे महत्त्व वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. म्हणूनच सुमैया यांच्या कामाचा आवाका प्रत्येकीसाठी प्रेरणादायी ठरेल याची खात्री आहे.

एका सुशिक्षित कुटुंबात जन्म घेऊनही पालकांनी कायमच त्यांना घरात जाणवणाऱ्या, सहन कराव्या लागणाऱ्या समस्यांकडे दुर्लक्ष केले. इतकेच नव्हे तर त्याचा सगळा दोष सुमैया यांच्याच माथी मारला. एके दिवशी पेशाने वकील असणाऱ्या काकानेच त्यांच्याशी गलिच्छ गोष्टी केल्या. मात्र कुटुंबाला त्याच्या त्या कृत्याबद्दल सांगूनही सर्वांनी सुमैया यांनाच दोष दिला. गप्प राहण्याचा सल्ला दिला. अशी त्रासदायक परिस्थिती असल्यामुळे २०१३-१४ च्या सुमारास त्या घरातून पळून गेल्या. त्यावेळी सुमैया केवळ १९ वर्षांच्या होत्या. पायात पादत्राणे नाहीत, अंगावर खराब कपडे, जखमेच्या खुणा अशा अवस्थेत त्यांनी घर सोडले होते. खरे तर ही त्यांच्या माझ्या स्वातंत्र्याची वेळ होती. घर सोडून कोलकात्याच्या हावडा ब्रिजवर उभ्या असताना आत्महत्येचा विचारही मनात डोकावून गेला. पण या नकारात्मकतेवर मात करत त्या पाटण्याला एका मित्राकडे गेल्या. त्याच्या साह्याने छोटी-मोठी नोकरी केल्यानंतर एका चांगल्या कंपनीत सुमैया यांना नोकरी मिळाली. त्यानंतर त्यांनी घरी फोन करुन आपण जिवंत असल्याचे सांगितले. त्यांनी पित्याशी फोनवर संपर्क साधला. मी आयुष्यात पहिल्यांदाच माझ्या वडिलांना रडताना पाहिले... असे त्या या संवादाचे वर्णन करताना सांगतात. नंतर वडिलांनी त्यांची माफी मागितली आणि घरी परत येण्याची खूप विनंती केली.

मानिनी

आम्ही तुला पाहिजे ते करायला तयार आहोत, असे सांगितले. त्यामुळे त्या कोलकात्याला परत गेल्या. पुढे वडिलांनी सगळ्यांच्या विरोधात जाऊन सुमैया यांना शिकवले. घरातील सर्वांची इच्छा होती की, आता या मुलीचे लग्न व्हावे पण वडिलांनी आधी आपल्या मुलीचे मत विचारले आणि तुला पुढे शिकायचे आहे का? हा प्रश्न केला. अर्थात सुमैया यांनी त्यास होकार दिला आणि मला कायद्याचे शिक्षण घ्यायचे आहे, असे उत्तर दिले. त्यानंतर



त्यांनी विधी महाविद्यालयात प्रवेश घेऊन कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. अभ्यास करा आणि स्वतःला सिद्ध करा... हाच मंत्र सुमैया आपल्या ला प्रेरणा मानणाऱ्या सगळ्या मुलींना, महिलांना देतात. कायद्याचा अभ्यास पूर्ण करून त्या दिल्लीत स्थायीक झाल्या असून आधी उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी ॲसिड हल्ल्यातून वाचलेल्यांसाठी काम करण्याच्या कामी स्वतःला वाहून घेतले आहे. त्यांच्या मदतीने अत्याचाराच्या बळी पडलेल्या अनेकींना न्याय मिळाला आहे. सुमैया यांचे हे काम समाजात वेगळी जागरुकता आणणारे आहे हे नक्की.

## भाडेतत्त्वावर राहताय?



सध्या अनेक मुली, महिला शिक्षण वा कामानिमित्त घरापासून दूर वेगळ्या शहरात, गावात राहतात. त्यासाठी पेईंग गेस्ट, होस्टेल, कंपनीने पुरवलेली निवासव्यवस्था आदी पर्याय असले तरी भाड्याने घर घेऊन स्वत:ची स्पेस जपण्यास अनेकजणी प्राधान्य देतात. परंतु काही प्रकरणांमध्ये करार असूनही भाडेकरूला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणूनच भाडेकरूंसाठी असणाऱ्या कायद्यांची, त्यांच्या हक्कांची माहिती असायला हवी.

✽ भाडेकरूंच्या हक्कांपैकी एक म्हणजे घर हे संरचनात्मकदृष्ट्या मजबूत, कीटकांपासून मुक्त आणि पाणी, वीज यासारख्या मूलभूत सुविधांनी सुसज्ज असले पाहिजे. या सर्व गोष्टी भाडेकरूंच्या अधिकारांतर्गत येतात. भाडेकरूने यासंबंधीची बिले भरण्यास उशीर केल्यास मालक कनेक्शन खंडित करू शकत नाही. हे पाऊल केवळ महापालिका अधिकारी किंवा सेवा पुरवठादारच उचलू शकतात.

✽ भारतीय कायदा भाडेकरूंना घरमालकांकडून मनमानीपणे बेदखल करण्यापासून संरक्षण प्रदान करतो. भाडेकरू आणि घरमालक यांच्यातील करार ११ महिन्यांसाठी आहे. दरम्यान, मालक भाडेकरूला घर रिकामे करण्यास सांगू शकत नाही. घरमालक कायद्याने ठरवून दिलेल्या विशिष्ट परिस्थितीतच भाडेकरूला बाहेर काढू शकतात, जसे की भाडे न भरणे, घराचे नुकसान, घराची दुरुस्ती करणे अत्यावश्यक असणे, घरमालकाने मालमत्ता विकली आहे किंवा भाडेकरूने नियमांचे उल्लंघन करणे इ...


जाणून घ्या

✽ भाडेकरूंना घरमालकाकडून कोणताही त्रास झाल्यास वा त्यांच्या हक्कांचे उल्लंघन झाल्यास कायदेशीर मार्ग शोधण्याचा अधिकार आहे. तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी ते योग्य दिवाणी न्यायालय किंवा भाडे नियंत्रण प्राधिकरणाकडे जाऊ शकतात.

✽ भाडेकरूंना घरमालकाच्या अवाजवी हस्तक्षेपाशिवाय गोपनीयतेचा आणि परिसराचा शांततापूर्ण आनंद घेण्याचा अधिकार आहे. घरमालकांनी भाडेकरूंच्या गोपनीयतेचा आदर करणे आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थिती वगळता, घरमालकाला भाडेकरूच्या परवानगीशिवाय मालमत्तेत प्रवेश करण्याचा अधिकार नाही. विशेषत: महिला भाडेकरूंच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे, असे म्हणावे लागेल.

## उन्हाळा...आहाहा!

आईस्क्रीम हा आबालवृद्धांचा आवडता पदार्थ आहे. असह्य उन्हात आईस्क्रीमची चव चाखायला मिळाली तर ... आहाहा! कल्पना करूनच छान वाटू लागलं आहे. उन्हाळ्यात विविध प्रकारचं आईस्क्रीम घरी करणार असाल तर या रेसिपी तुम्हाला उपयुक्त ठरतील यात शंका नाही.



**ब्लूबेरी कोकोनट पॉप्सिकल्स**

**साहित्य-** दोन कप करवंदाचा गर, चार टेबलस्पून पाणी, पाच टेबलस्पून मेपल सिरप, तीन चतुर्थांश नारळाचं दुध, अर्धा कप बदामाचं दुध

**कृती-** सगळ्यात आधी एका भांड्यात करवंदांचा गर, पाणी आणि तीन टेबलस्पून मेपल सिरप मंद आचेवर उकळून घ्यावं. थंड होण्यासाठी ठेवून द्यावं. दुसऱ्या भांड्यात नारळाचं दूध, दोन टेबलस्पून मेपल सिरप आणि बदामाचं दुध मिसळून घ्यावं. पॉप्सिकल्सचे मोल्ड घ्यावेत. त्यात अर्ध्यापर्यंत ब्लूबेरीचं मिश्रण घालावं. अर्ध्यापर्यंत नारळाच्या दुधाचं मिश्रण घालावं. हे मोल्ड सेट होण्यासाठी फ्रिजमध्ये ठेवून द्यावं. ब्लूबेरी कोकोनट पॉप्सिकल्स तयार आहेत.

रसगंधा

**दही आईस्क्रीम**



उन्हाळ्यात दही खाणं ही पर्वणी असते. अनेक पदार्थांमधून दह्याचा वापर अत्यंत खुबीने केला जातो.

**साहित्य-** अर्धा कप दही, पाव कप साखर, अर्धा कप क्रीम, दोन थेंब व्हॅनिला इसेंस, दहा काजू (लहान काप), चार बिस्कीट

**कृती-** दही आणि साखर मिसळून चांगल्या प्रकारे फेटून घ्यावं. त्यानंतर त्यात क्रीम आणि व्हॅनिला इसेंस टाकून फेटून घ्यावं. मिश्रणात काजूचे काप मिसळून घ्या. त्यानंतर एअर टाईट कंटेनरमध्ये बिस्कीटांचे तुकडे टाकावेत. मिश्रण टाकावं. हे आईस्क्रीम फ्रीजरमध्ये ठेवावं. पाच ते सहा तासांनी आईस्क्रीम तयार होईल.

## गॅजेटमयी होणे धोक्याचे

आजकाल दुनिया गॅजेटमयी झाली आहे. मोठ्यांच्या हातातील गॅजेट्स लहानांना हाताळण्याचा मोह होणं सहाजिक आहे. अशा वेळी मुलांना गॅजेट वेडापासून कसं दूर ठेवावं, याविषयी...

✽ **रोल मॉडेल बना-** लहान मुलं आई-वडिलांचं अनुकरण पावलोपावली करत असतात. त्यामुळे पालकांनी शक्यतो मुलांसमोर गॅजेटस वापरणं टाळावं, अथवा गॅजेट्सचा वापर कमी करावा. जेणेकरून मुलं गॅजेट्सकडे आकृष्ट होणार नाहीत.

✽ **गिफ्ट निवडताना काळजी घ्यावी-** मुलांचं वय दहा वर्षांच्या आतील असेल तर त्यांना गॅजेट्स गिफ्ट करणं टाळा.

✽ **योग्य जागेची निवड-** कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप घरात सर्वांना दिसू शकेल अशा ठिकाणी ठेवणं गरजेचं आहे. त्यामुळे मुलं या वस्तू कितीवेळ वापरतात यावर प्रत्येक सदस्याचं लक्ष राहील.



✽ **नो-डिव्हाईस टाईम-** मुलांना चांगल्या सवयी लागाव्यात, यासाठी घरात नियमांचं पालन करण्याचा प्रयत्न करावा. याचप्रमाणे प्रत्येकाने घरात 'नो डिव्हाईस टाईम' पाळणं महत्त्वाचं आहे. या वेळी घरातील प्रत्येकाने डिव्हाईसेस लांब ठेवून गप्पा, घरातले खेळ यांसाठी वेळ द्यावा.

पॅरेंटिंग

✽ **आउटडोर ॲक्टीव्हिटीही महत्वाची-** मुलं घरात बसून तासंतास गेम्स खेळतात. अशा वेळी त्यांना आउटडोर खेळांसाठी प्रोत्साहन द्यावं. पालकांनी स्वत: सहभागी होऊन प्रोत्साहन दिल्यास मुलं गॅजेट्सपासून लांब राहतील यात शंका नाही.

## बीचवर काळजी घ्या

सुट्टीचे दिवस सुरू आहेत, अशा वेळी सहलींचं प्लॅनिंग केलं जातं. अनेकदा सहलीला जाण्यासाठी बीचची निवड केली जाते. पण समुद्राच्या खाऱ्या पाण्यामुळे केसांचा पोत बिघडतो. अशा वेळी सोप्या ट्रिक्स वापरून केसांची काळजी कशी घ्यावी, याविषयी

✽ समुद्रकिनारी वास्तव्य असेल तोपर्यंत एक दिवसाआड केसांचं कंडिशनिंग करावं. धूळ, ऊन आणि रेतीमुळे केस कोरडे होतात. शक्य असल्यास हेअर मास्कचा वापरही केसांवर करता येऊ शकतो.

✽ समुद्रात जाण्यापूर्वी केस साध्या पाण्याने ओले करून घ्यावेत. त्यामुळे केसांकडून खारं पाणी कमी प्रमाणात शोषलं जाईल.

✽ बीचवर जाताना स्कार्फ आणि हॅट्चा वापर करणं गरजेचं आहे असं अनेकदा ऐकलं असेल. कारण बीचवरील कडक उन्हामुळे चेहऱ्यावर गंभीर परिणाम होतो. पण बीचवर जाताना केवळ चेहराच नाही तर केसांची काळजी घेणंही गरजेचं आहे. हॅट आणि स्कार्फचा वापर केल्याने केसांचं नुकसान टाळणं शक्य आहे.

✽ बीचवर दिवसभर उन्हात राहिल्यानंतर केसांवर ड्रायरचा वापर करणं योग्य नाही. ब्लो ड्रायरने सुकवण्याऐवजी केस नैसर्गिकरित्या वाळवावेत.




भटकंती

✽ बीचवर जाताना केसांसाठी कुठलं प्रॉडक्ट योग्य ठरेल याचा अंदाज घ्या. केसांसाठी ॲंटी फ्रीजिंग प्रॉडक्ट आणि सन प्रोटेक्शन शँपूचा वापर करा. तेल किंवा सीरमचा वापरही लाभदायक ठरू शकतो.

## पर्याय शोध, पुढे जा

मी पन्नाशीच्या घरातील महिला असून एका छोट्या कंपनीत कार्यरत आहे. पगार फार चांगला नसला तरी या रकमेचा आधार वाटतो. अडीनडीला पैसे पुढे करता येतात. पण आता हा आधार दूर करावा लागतो की काय अशी शंका येतीये. माझ्याकडे वृद्ध सासू-सासरे आहेत. त्याचबरोबरच आता वृद्ध माता-पित्यांची जबाबदारीही माझ्यावर येऊ घातली आहे. एकूलता एक भाऊ नोकरीनिमित्त परदेशी जाणार असल्याने आईवडिलांची जबाबदारी अपरिहार्यपणे माझ्यावरच येणार आहे. आता ते दोघेही थकले आहेत. असं असताना चार वृद्धांची काळजी घेण्यात मी हरवून जातीये की काय अशी शंका येतीये. मला आत्तापासूनच याचं दडपण आलं आहेवर परिणाम होण्याची भीतीही आहे. काय करु, ही स्थिती कशी हाताळू?



- सखी,

मध्यमवयात शरीर आणि मनाची उमेद कमी होत असली तरी जबाबदाऱ्या संपायचं नाव घेत नाहीत. घरातील वृद्धांची जबाबदारी घ्यावीच लागते. पण यामुळे आत्तापासून घाबरुन जाऊ नकोस. सध्या या कामी मदत करणाऱ्या अनेक संस्था आणि व्यक्तींची मदत मिळू शकते. एखादा केअर टेकर नेमण्याचा पर्याय तू निवडू शकतेस. घराशेजारी एखादा रिकामा फ्लॅट असल्यास तिथे या चौघांची सोय करणं योग्य ठरेल. तिथे सगळ्या सुविधा उपलब्ध करुन दिल्यास त्यांनाही निश्चिंतपणे राहता येईल. परस्परांशी संबंध चांगले असल्यास ते अत्यंत समाधानाने एकत्र राहतील. हवा तसा वेळ घालवू शकशील. मुख्य म्हणजे यामुळे तुला नोकरी सोडण्याची वेळ येणार नाही. तेव्हा विचार कर आणि निर्णय घे.

समुपदेशन

## पार्टीची मौज लुटताना...

ऑफिस पार्टीमध्ये वरिष्ठांवर प्रभाव पडावा यासाठी अनेकजण प्रयत्न करत असतात. पण ऑफिस पार्टी बिनधास्त वावरण्याची जागा नसते हे समजून घ्यायला हवं. सर्व व्यवस्थापनांमध्ये ताळमेळ असावा, सहकाऱ्यांना जाणून घेता यावं, यासाठी ऑफिस पार्टीचं आयोजन केलं जातं. पार्टीमधील तुमचा वावर आत्मविश्वासपुर्वक असला पाहिजे. पार्टीमध्ये खाणं आणि ड्रिंक्स कशाप्रकारे आणि किती प्रमाणात घ्यावीत, हे ठरवायला हवं. स्वत:बद्दल कितीही आत्मविश्वास असला तरी ऑफिस पार्टीमध्ये प्रमाणाबाहेर ड्रिंक्स घेणं टाळावं. एटीकेट्ससाठी एखादं ड्रिंक्स चालू शकतं. आत्मविश्वासाच्या कमतरतेमुळे अनेकजण ऑफिस पार्टीला जाणं टाळतात. खरं पाहता पार्टीमध्ये न गेल्याने तुमच्या स्वभावातील उर्मटपणा दिसून येतो. ऑफिस पार्टीकडे आव्हान म्हणून न बघता संपर्क निर्मितीची संधी म्हणून पाहणं गरजेचं आहे. पार्टीत गप्पा मारताना नाजूक विषयांवर थेट टिप्पणी करणं देखील टाळावं. नवीन व्यक्तींशी ओळख करून घेताना स्वत:बद्दल संक्षिप्त स्वरुपात माहिती द्या. पार्टीमध्ये सिनीयर-ज्युनिअर हा भेद नसला तरी वरिष्ठ तुमचे मित्र नाहीत ही बाब विसरू नका. पार्टी सुरू झाल्यापासून संपेपर्यंत थांबणं गरजेचं नसतं. तुम्ही पार्टीतून लवकर निघणार असाल तर टीम मॅनेजरला तशी कल्पना द्यायला विसरू नका. जेणेकरून तुम्ही जबाबदार आहात हे दिसून येईल. पार्टीमधून निघायच्या आधी संयोजकांचे आभार मानायला विसरू नका.



ऑफिस ऑफिस

### आरोग्य संपदा

#### ...म्हणून खावा विडा

मुखशुद्धीसाठी पान अर्थात विडा खाणे ही आपल्याकडे पूर्वीपासून चालत आलेली पद्धत आहे. विडा तयार करताना त्यात समाविष्ट केलेले अनेक घटक आरोग्यास हितकर ठरत असतात.




उदाहरणार्थ, पानातील सुपारीमुळे सर्दी-खोकल्याचा त्रास कमी होतो तसेच डोकेदुखीही कमी होते. तसेच तुळशीच्या बियांमध्ये असणारे गुणधर्म घसादुखी आणि खोकल्यापासून आराम देतात. खेरीज तुळशीच्या बिया पानासह खाल्ल्याने पचनक्रिया मजबूत होते. असे पान खाल्ल्यास लाळ ग्रंथी सक्रिय राहण्यास मदत होते. ही ग्रंथी अन्नाचे लहान तुकडे करण्याचे काम करत असल्यामुळे बद्धकोष्ठता, अपचन आणि गॅसची समस्या दूर होण्यासही मदत होते.

### सौंदर्य साधना

#### त्वचा कोरडी पडलीये?

प्रखर सूर्यप्रकाशात फिरल्यामुळे त्वचा कोरडी होते. हा त्रास टाळण्यासाठी त्वचेला अतिरिक्त काळजी आणि पोषण आवश्यक असते हे लक्षात घ्या. त्वचा कोरडी असेल तर चेहरा धुण्यापूर्वी आधी मॉइश्चरायझर लावा. तुम्हाला मॉइश्चरायझर लावायचे नसेल तर बदामाचे तेल लावले तरी चालेल. त्यानंतर काही वेळाने चेहरा धुवा. यामुळे त्वचा मऊ राहते आणि तीव्र प्रकाशामुळे झालेली त्वचेला हानी भरुन निघण्यासही मदत होते.



### उपयुक्त काही

#### करा गोवरीचा धूर

हवामान बदलत आहे. सर्व झाडांवर फुलोरा आला आहे. अशा वेळी डासांची संख्याही वाढते. मात्र त्यांचा त्रास टाळण्यासाठी कोणतेही तीव्र रसायनयुक्त घटक वापरण्यापेक्षा शेणाच्या गोवरीचा वापर करुन बघा. घराच्या कोणत्याही कोपऱ्यात किंवा खोलीत मडके वा एखादे मातीचे भांडे ठेवून सायंकाळी त्यात गोवरी पेटवा. या धुराने कीटक आणि डास पळून जातातच खेरीज वातावरणही शुद्ध आहे. सध्या शेणापासून बनवलेल्या अगरबत्तीही बाजारात उपलब्ध आहेत. त्या वापरण्यासही सोप्या आहेत. त्यामुळे डास, माशा वा कोळी घराबाहेर ठेवण्यासाठी अशा उदबत्त्या अवश्य वापरा



## असा करा ब्रशचा वापर

चांगला मेक अप करणं आव्हानात्मक असतं. नवशिक्या महिलांनी मेक अप करताना ब्रशचा वापर केल्यास अडचणी येत नाहीत. मेक अप ब्रशचे प्रकार आणि वापर याविषयी अधिक जाणून घेऊ.

✽ **फाउंडेशन ब्लेंडिंग ब्रश-** हा मेक अपचा सगळ्यात बेसिक ब्रश आहे. फाउंडेशन लावल्यानंतर हळू हळू या ब्रशने त्वचेवर फाउंडेशन पसरावं. गोल आकारात ब्रश फिरवल्याने फाउंडेशन त्वचेवर योग्य प्रकारे पसरलं जातं.

✽ **कन्सिलर ब्रश-** चेहऱ्यावरील डाग लपवण्यासाठी कन्सिलरचा वापर केला जातो. कन्सिलर ब्रशच्या सहाय्याने अधिक चांगल्या पद्धतीने लावलं जातं. डार्क सर्कल, सुरकुत्या, बारीक रेषा लपविण्यासाठी या ब्रशच्या निमुळत्या टोकाने कन्सिलर पसरावं.

✽ **पावडर ब्रश-** कन्सिलरनंतर पावडरचा क्रमांक येतो. त्वचेवर पावडर योग्यप्रकारे सेट होण्यासाठी या ब्रशचा वापर करावा. हा ब्रश ब्लश लावण्याच्या कामीही उपयोगी ठरतो.

ब्युटी मंत्रा

✽ **ब्लेंडिंग ब्रश-** आयशॅडो लावण्यासाठी ब्लेंडिंग ब्रश एकदम परफेक्ट आहे. हा ब्रश मुलायम आणि लवचिक असतो. त्यामुळे डोळ्यांवरील त्वचेवर आयशॅडो अगदी सहजतेने लावणं शक्य होतं. शंकू आकारातील ब्रश डोळ्याच्या वरच्या कोनांपर्यंतही सहजपणे पोहचू शकतो.



✽ **हाय लायटर ब्रश-** हा मेक अप किटमधील सर्वात महत्त्वाचा ब्रश आहे. मेक अप खुलवण्यासाठी या ब्रशचा उपयोग होतो. हा ब्रश विरळ असल्याने हायलायटर योग्यप्रकारे सेट होण्यास मदत होते. चीकबोन्स, नाक आणि गाल यांवर या ब्रशने हायलाईट करता येतं.